- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४१,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२६,३५० /-
✔ चांदी : १,७५,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : सोमवार, १६ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३६ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

गडचिरोली 'स्टील सिटी' म्हणून पुढे येतेय : मुख्यमंत्री

दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते की, जनजातीय जातींचा सन्मान हाच भाजपचा सन्मान आहे. धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांची जयंती जनजातीय गौरव दिवस म्हणून साजरी केली जात आहे. संपूर्ण भारतामध्ये होणाऱ्या या मुख्य कार्यक्रमाचे आयोजन आपल्या गडचिरोली होत आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जनजातीय समाजाचा आदिवासी समाजाचा एक मोठा इतिहास आणि एक समृद्ध अशी संस्कृती आहे. ज्या-ज्या वेळी देशावर हल्ले झाले, त्यावेळी लढण्यासाठी आदिवासी नायक पुढे राहिले, पण त्यांना कोणीही लक्षात ठेवले नाही. आम्हाला जो इतिहास शिकवला, त्यामधून त्यांचे योगदान काढून टाकण्यात आले. पण, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि त्यांनी आदिवासी नायकांचे योगदान जगासमोर आणण्याचा निश्चय केला. आता लोकांसमोर हा इतिहास पुन्हा येत असून लोकांना तो कळत आहे.

आदिवासी बांधवासाठी अनेक योजना

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, इंग्रजांनी सावकारांना हाताशी धरत आमच्या आदिवासी बांधवांना पाणी, जंगल आणि जमिनीपासून वंचित करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यावेळी बिरसा मुंडा यांनी इंग्रजांसोबत लढत हे सर्व आदिवासी बांधवांना पुन्हा मिळवून दिले. धरती आबा आणि इतर अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो.

आदिवासी बांधवांसाठी आम्ही व्यवस्था करत आहोत, त्यांना शिक्षण व राहण्याची उत्तम सोय उपलब्ध करून दिली आहे. आमचा गडचिरोलीसारखा जिल्हा, जो नक्षलवादाशी आणि माओवादाशी लढत होता, तो आता १०० टक्के माओवादातून मुक्त झाला असून स्टील सिटी म्हणून पुढे येत आहे. यामध्ये सर्वात पुढे आदिवासी समाज आहे.

बिरसा मुंडा म्हणजेच आदिवासींचा स्वाभिमान : एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की भगवान बिरसा मुंडा यांना कोटी-कोटी प्रणाम! जनजातीय गौरव दिवसाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. हा एक ऐतिहासिक दिवस आहे. लुबाडणूक, फसवणुकीच्या विरोधात बिरसा मुंडा यांनी संघर्ष केला. त्यांना कोटी-कोटी वंदन.

बिरसा मुंडा म्हणजे आदिवासींचा स्वाभिमान. आदिवासींच्या विकासात अडथळा ठरणाऱ्या नक्षल्यांचा खात्मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. गडचिरोली हा आता देशाच्या नकाशावरील शेवटचा जिल्हा राहिलेला नाही, तर तो विकासाचा पहिला जिल्हा ठरेल. सध्या या भागात आधुनिक विकासाचे काम सरकारकडून वेगाने सुरू आहे.

थोडक्यात


कारच्या धडकेत दुचाकीवरील दोघांचा मृत्यू

लातूर : राज्यातील रस्ते अपघाताच्या घटना सातत्याने समोर येत असून पुन्हा एकदा लातूर जिल्ह्यात भीषण अपघाताची घटना घडली. जिल्ह्यातील टाका पाटीजवळ कार, दुचाकी आणि टेम्पोचा भीषण अपघात झाला असून या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला असून तीन ते चार जण गंभीर जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातानंतर स्थानिकांनी, तसेच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.लातूर जिल्ह्यातील टाका पाटीजवळ कार, दुचाकी आणि टेम्पो यांच्यात भीषण अपघात झाला. तुळजापूरहून औसाकडे जात असताना भरधाव कारने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील तायप्पा दिगंबर बंडगर आणि ओंकार गोपाळ बंडगर या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर तीन ते चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर दोन्ही गाड्या रस्त्याच्या कडेला पडल्या असून चारचाकी कारचा पुढील भाग भुगा झाल्याचं दिसून येत आहे. त्यावरुन, अपघाताच्या तीव्रतेचा अंदाज बांधता येऊ शकतो. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर, जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्ते अपघाताची समस्या गंभीर होत असल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये होतेय.

शेगावहून दर्शन घेऊन परतताना अपघातात दुचाकीवरील तीन तरुण ठार

वृत्तसंस्था, बुलढाणा

रविवारचा आजचा दिवस अपघात वार ठरल्याचं दिसून आलं, सकाळी नदिड जिल्ह्यात भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. तर, बेळगावमध्ये एकाच कुटुंबातील तीघांना आपला जीव गमावावा लागला. आता, बुलढाणा जिल्ह्यातील मुंबई कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६ वर खामगावनजीक भीषण अपघाताची घटना घढली असून तीन तरुणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. महामार्गावरील भरधाव दुचाकीची ट्रकला धडक बसल्याने हा अपघात झाला. त्यात, दुचाकीवरील तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. नांदेड, बेळगावनंतर आता



बुलढाणा जिल्ह्यातही भीषण अपघाताची दुर्घटना घडली. या दुर्घटनेत तीन तरुणांचा मृत्यू झाल्याची मन हेलावणारी घटना घडली आहे. जळगाव जिल्ह्याच्या बोदवड तालुक्यातील घाणखेड गावचे हे तिघेही तरुण आहेत. शेगाव येथून संत गजानन महाराजांचे दर्शन करून परत घराकडे जात असताना अपघाताची घटना घडली. दिगंबर इंगळे (३०), मयूर होले (२४) आणि पंरेश चुले (१७) अशी मृत तरुणांची नावे असून या दुर्घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच, या अपघातामुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६ वर नागपूरहून मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळासाठी ठप्प करण्यात आली होती.

समृद्धी महामार्गावर कळप

जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर परवाच सिंदखेड राजाजवळ भीषण अपघातात २० ते २२ वाहनांचा चुराडा झाला. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नसली तरी आर्थिक नुकसान मोठे झाले आहे. मात्र, तरीही समृद्धी महामार्ग प्रशासनाला जाग आलेली नाही व समृद्धी महामार्ग प्रशासन प्रवाशांच्या जीवाशी खेळत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सिंदखेड राजा ते संभाजीनगर दरम्यान मुंबई कॉरिडॉर वरील चॅनेज ४०७ वर एक गुरांचा कळप चक्क समृद्धी महामार्गावर उभा असल्याचं काही वाहनधारकांना दिसून आलं.

नशीब बलवत्तर या वाहनधारकांनी आपली वाहन थांबवून हा गुरांचा कळप बाजूला केला. खरंतर समृद्धी महामार्ग हा एक्सेस कंट्रोल महामार्ग असून या महामार्गावरील वाहनांची वेग मर्यादा १२० किलोमीटर प्रति तास असते अशातच जर गुरांचा कळप अचानक महामार्गावर आला तर मोठी भीषण दुर्घटना घडू शकते. मात्र, अद्यापही समृद्धी महामार्ग प्रशासनाला जाग आलेली दिसत नाही. हा प्रकार अतिशय धक्कादायक असून या ठिकाणी वाहने थांबले असताना सुद्धा सुदैवाने एक अपघात होताना टळला.

सीएसएमटी रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देण्याची धमकी

मुंबई : मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे खळबळ उडाली आहे. धमकीबद्दलची माहिती मिळताच मुंबई पोलिस आणि सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या. रेल्वे स्थानकावर पथकांना पाचारण करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पोलिस नियंत्रण कक्षातील ११२ नंबर कॉल करण्यात आला. कॉल केलेल्या व्यक्तीने पोलिसांना सांगितले की, सीएसएमटी रेल्वे स्थानका बॉम्ब ठेवण्यात आला आहे. व्यक्तीने ज्या नंबरवरून कॉल केला तो त्याची माहिती पोलिसांनी दिली. प्रवाशांची गर्दी असलेल्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याच्या धमकीने पोलीस दलात खळबळ उडाली. त्यानंतर पोलिसांनी श्वान पथक आणि बॉम्ब शोधक आणि निकामी पथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांनी संपूर्ण स्थानकाची आणि संशयित ठिकाणांची तपासणी केली. रात्री ९.३० वाजता शोध मोहीम थांबवण्यात आली. कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. दरम्यान, पोलिसांनी आता कॉल करून धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू केला आहे.



कॉंकरोच जनता पार्टीकडून संघटना बांधणीला जोर

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहारसह १० राज्यात टीम निवडली

नवी दिल्ली : अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वातील कॉंकरोच जनता पार्टीनं संघटना वाढीवर लक्ष केंद्रीत केलं आहे. याच भाग म्हणून सीजेपीनं शनिवारी त्यांच्या संघटनेच्या विस्ताराचा भाग म्हणून झोनल प्रभारी जाहीर केले. तर, १० राज्यात राज्य आणि प्रादेशिक समन्वय समित्या स्थापन केल्या आहेत. सीजेपीनं क्षितिज पगार यांना पश्चिम विभागाचे प्रभारी, डॉ. विवेक सांगवान यांना उत्तर विभागाचे प्रभारी नियुक्त केलं आहे. मुहम्मद जनैद आणि गीगराज जोरली यांना उत्तर विभागाच्या समन्वय समितीचे सदस्य म्हणून नियुक्त केलं आहे. कॉंकरोच जनता पार्टीनं जम्मू कश्मीर, राजस्थान, पश्चिम बंगाल, हरियाणा, झारखंड, ईशान्य भारत (नॉर्थ ईस्ट), महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार आणि उत्तराखंड या राज्यात समन्वय समित्या स्थापन केल्यात.

सीजेपीच्या उत्तर प्रदेश समितीत १६ सदस्य आहेत. महाराष्ट्रात १५, झारखंडमध्ये १४, ईशान्य भारतात १४, बिहारमध्ये 13, पश्चिम बंगालमध्ये १२,हरियाणामध्ये ६, राजस्थानमध्ये ५, उत्तराखंडमध्ये ६ आणि जम्मू काश्मीरमध्ये ४ सदस्य आहेत. सीजेपीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार या समित्या त्यांच्या विभागात संघटनेच्या कार्यक्रमांची आखणी करेल. प्रत्यक्ष जमिनीवर संघटना बांधणी करणे, प्रभाव वाढवणे ही कामं सीजेपी करेल.

सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या एका टिप्पणीनंतर सीजेपीची सुरुवात मे महिन्यात झाली होती. कॉंकरोच शब्द सरन्यायाधीशांनी उच्चारला होता, त्याच शब्दाचा वापर करत अभिजीत दिपके यांनी कॉंकरोच जनता पार्टी नावानं सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खातं काढलं होतं.सीजेपीचा प्रयोग लोकप्रिय ठरला. सीजेपीनं नीट पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरव्यवहाराविरोधात नवी दिल्लीतील जंतरमंतरवर ३६ दिवस आंदोलन केलं होतं. या आंदोलनात पेपरफुटी जबाबदारी निश्चित व्हावी आणि तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी सेजीपीनं केलेली. अखेर २५ जुलै रोजी धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर सीजेपीनं इतर मुद्दे हातील घेतले होते. त्याज स्कूल ठीक करो अभियान होतं. निवडणूक आयोगाकडून राबवण्यात येत असलेल्या एसआयरमधील त्रुटींबाबत सीजेपीनं आवाज उठवला होता. सीजेपीनं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची देखील मागणी केली आहे.

एस.टी. कंत्राटी भरतीत पैसे उकळणारे रॅकेट सक्रिय

वृत्तसंस्था, नागपूर/कोल्हापूर

बेरोजगार तरुणांना एसटीत नोकरीचे आमिष दाखवून पैसे उकळणा-या काही खासगी संस्था राज्यभर सक्रिय झाल्या आहेत. एका संस्थेने नागपुरात एसटीत भरतीचा फलक लावल्याचे महामंडळाच्या निदर्शनास आले होते. कोल्हापुरातही काही संघटनांचे पदाधिकारीच भरती प्रक्रियेत सक्रिय झाले आहेत.

राज्य मार्ग परिवहन महामंडळात कंत्राटी पद्धतीने १३ हजार ९८० चालक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे. त्यासाठी डिसेंबर महिन्यात निविदा प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यासाठी एक कंपनी निश्चित केली आहे. मात्र या कंपनीच्या नावाखाली नागपुरात एकाने येथे एसटी भरतीसाठी संपर्क साधा, असा फलक लावला. त्यासह पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातून भरतीसाठी यंत्रणा सक्रिय झाली आहे. कोल्हापुरातही काही एसटी संघटनांचे पदाधिकारी, एजंट सक्रिय झाले आहेत. काही अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवला गेला. मात्र ते संबंधित अधिकाऱ्यांनी राजकीय वरदहस्ताखाली बदली थांबवून पदावर रुजू झाले. हीच यंत्रणा कोल्हापुरात कंत्राटी भरती प्रक्रियेत सक्रिय झाली आहे.

संस्थेमार्फत होणारी उमेदवाराची निवड महामंडळाने निश्चित केलेल्या पात्रता निकषांनुसारच करण्यात यावी. तसेच, या प्रक्रियेत कोणत्याही उमेदवाराची फसवणूक होणार नाही, असे आदेश एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.



एसटीकडे तक्रारी

एसटी महामंडळाच्या नावाचा गैरवापर करून काही खासगी संस्था गरजू आणि बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवत आहेत. त्यांच्याकडून अवैधरित्या पैसे उकळत असल्याच्या तक्रारी प्रशासनाला मिळाल्या आहेत. नोकरीच्या अपेक्षेने या संस्थांवर विश्वास ठेवणाऱ्या तरुणांची आर्थिक फसवणूक होत आहे.

गुन्हे दाखल होणार

एसटी महामंडळाच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांची महामंडळाच्या सुरक्षा आणि दक्षता विभागातर्फे चौकशी करावी. उमेदवारांची फसवणूक करणाऱ्या खासगी संस्था, त्यांच्याशी संबंधित व्यक्तींची ओळख पटवून दोषींविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करावेत, असे आदेशही परिवहन विभागाने दिले आहेत.

कंत्राटी भरती करूच नये : काँग्रेस

महामंडळाने कंत्राटी भरती करूच नये. सरकारच्या अन्य विभागात कायमस्वरूपी भरती केली जात आहे. मात्र प्रवाशांची सुरक्षा आणि सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळात कंत्राटी कर्मचारी भरती केले जात असल्याची माहिती राज्य एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिली आहे.

फसवणूक टाळण्यासाठी काय कराल ?

एसटी महामंडळाची कोणतीही भरती ही केवळ अधिकृत संकेतस्थळावर किंवा अधिकृत कंत्राटदार कंपनीमार्फतच जाहीर केली जाते. नोकरी लावून देण्यासाठी कोणीही पैशांची मागणी करत असल्यास त्याला बळी पडू नका. महामंडळात भरतीसाठी कोणतीही लाच किंवा शुल्क आकारले जात नाही. मिळालेले नियुक्तीपत्र खरे आहे की खोटे, याची खात्री जवळच्या एसटी विभागीय कार्यालयात जाऊन करा. कोणी फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा एसटीच्या दक्षता विभागाकडे तक्रार नोंदवा.

विहिरीचा कठडा कोसळून ४ मजूर ठार



वृत्तसंस्था, पंढरपूर

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात नवीन विहिरीचे काम सुरू असताना अचानक विहिरीचा कठडा कोसळल्याची दुर्घटना घडली. या अपघातात मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या चार मजुरांचा जागीच मृत्यू झाला आहे.

या दुर्घटनेत मंगेश मोरे, सिद्धेश्वर घाडगे, तानाजी घोडके, आबा घोडके हे चार लोकांचा मृत्यू झाला आहे. आंबे गावातील शेतकरी निवास शिंदे यांच्या शेतात नवीन विहीर खोदणे व बांधकामाचे काम सुरू होते. नेहमीप्रमाणे काही मजूर विहिरीत उतरून आपले काम करत होते. मात्र, यादरम्यान अचानक विहिरीचा कठडा कोसळला आणि विहिरीत काम करत असलेले सर्व मजूर मोठ्या मातीच्या ढिगाऱ्याखाली दाबले गेले.

ही भीषण दुर्घटना समजताच आंबे गावातील ग्रामस्थांनी कोणतीही वेळ न घालवता तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि स्वतः बचाव कार्य सुरू केले. परंतु, विहिरीत मोठ्या प्रमाणावर माती कोसळल्यामुळे मजुरांना सुखरूप बाहेर काढताना अनेक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस व प्रशासन देखील तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.

संपादकीय लेखणीतून...

विजेते 'अंडर-१९'

अल अमेरात (ओमान) येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात पाकिस्तानविरुद्ध शेवटच्या चेंडूवर थरारक विजय मिळवत भारतीय संघाने विक्रमी नवव्यांदा अंडर-१९ आशिया चषक पटकावला. विशेष म्हणजे गत आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानने भारताला १५१ धावांनी पराभूत करून दुसऱ्यांदा विजेतेपद आपल्या नावावर केले होते. त्या सामन्यातील तसेच यंदाच्या स्पर्धेतील गट सामन्यात झालेल्या पराभवाचा भारताने बदला घेतला. खरे तर भारताच्या अंडर-१९ संघाने पाकिस्तानच्या ओव्हर-१९ संघावर मात केली असे म्हणणे योग्य ठरेल. कारण भारतीय संघात खरोखर १९ वर्षाखालील खेळाडूच होते, तर पाक संघात विशी ओलांडलेल्या खेळाडूंचाच अधिक भरणा होता. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात भारताने पाकवर एक विकेट राखून थरारक, रोमहर्षक विजय मिळवला. शेवटच्या षटकात भारताला आठ धावांची गरज होती. शेवटच्या चेंडूवर विजयासाठी तीन धावांची, सामना टाय करण्यासाठी दोन धावांची गरज असताना दहाव्या क्रमांकावरील मोहित उल्वाने लेगस्पीनर अहमद हुसेनच्या चेंडूवर लाँग ऑफच्या दिशेने चौकार ठोकत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. २६ चेंडूत नाबाद ४९ धावा ठोकणारा मोहित उल्वा भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला. पाकिस्तानने विजयासाठी दिलेले ३३८ धावांचे लक्ष्य भारताने ९ विकेटस्च्या मोबदल्यात गाठले. लक्ष्य रायचंदानीच्या नेतृत्वात आणि ऋषिकेश कानिटकरच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाला साखळीत पाक संघाकडून पराभव पत्करावा लागला होता.

अंतिम लढतीतही पाकचेच पारडे जड दिसत होते. ३३८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची अवस्था ४२ व्या षटकात ८ बाद २५२ अशी बिकट बनली होती. अशावेळी मनल चौहान (३२ चेंडूत ४७ धावा) आणि मोहित उल्वा या जोडीने नवव्या विकेटसाठी ५७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. मनल बाद झाल्यानंतर भारताला विजयासाठी ३६ धावांची गरज होती आणि केवळ एक विकेट शिल्लक होती, पण मोहितने हार न मानता अकराव्या क्रमांकावरील सी. व्यंकटाला (८ चेंडूत नाबाद ११) सोबत घेत हार नही मानूंगाचे दर्शन घडवले. या जिद्दीवर विजयश्रीने भाळणे साहजिक होते. शेवटच्या षटकात भारताला ८ धावांची गरज होती. पहिला चेंडू वाईड ठरला. नंतर चार एकेरी धावा निघाल्या. अखेरच्या चेंडूवर तीन धावांची गरज आणि मोहितचा खणखणीत चौकार पाकचा सणसणीत पराभव! लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार लक्ष्य रायचंदानी (८० धावा) आणि वीरेंद्र सेहवाग पुत्र आर्यवीर सेहवाग (५८ धावा) या सलामी जोडीने १५ धावांची सलामी देत भारताला भक्कम प्रारंभ दिला. आर्यवीर बाद झाल्यानंतर लक्ष्य आणि अन्वय द्रविड (१९ धावा) लागोपाठ बाद झाले.

त्यामुळे भारतीय संघ अडचणीत सापडला. मात्र, तळाच्या फलंदाजांनी संयम आणि धाडस दाखवत विजय खेचून आणला. त्याआधी पाकने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद ३३७ अशी मोठी धावसंख्या उभारली होती. सलामीवीर उस्मान खानचे शानदार शतक आणि त्याने अब्दुल कादिरसोबत दुसऱ्या विकेटसाठी १८ षटकांत केलेली १३५ धावांची भागीदारी पाकला तीनशेपार जाण्यास कारणीभूत ठरली. कादिरने ५४ चेंडूत ८० धावा ठोकताना भारतीय गोलंदाजीची पिसे काढली. कर्णधार फरहान युसूफनेही ६० धावांचे योगदान दिले. भारताकडून काव्या पटेलने ६८ धावांत ४ तर सी. व्यंकटाने ४० धावांत ३ बळी घेतले. भारतीय युवा संघाने मिळवलेल्या विजेतेपदामुळे आशिया खंडातील भारताचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. भारतीय क्रिकेटपटूंना अशक्य ते शक्य करून दाखवण्याची सवयच लागली आहे असेच म्हणावे लागेल. भारतीय क्रिकेटपटूंमध्ये विजयाची जिद्द आणि संघासाठी काहीही करण्याची वृत्ती ठासून भरली आहे. भारताचा सलामीपटू आर्यवीर सेहवागला महत्त्वपूर्ण ५८ धावांची खेळी करताना कोपराला दुखापत झाली होती, परंतु त्या वेदना सहन करत त्याने फलंदाजी सुरू ठेवली होती. स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडू ठरलेल्या आर्यवीरला पाकविरुद्धच्या साखळी सामन्यात मोठी धावसंख्या उभारता आली नव्हती. त्यामुळे पुन्हा एकदा संघी मिळाल्यानंतर आणि दुखापत झाल्यानंतरही संघासाठी धावा करण्याचा त्याचा निर्धार होता. भारताला थरारक विजय मिळवून देणारा मोहित उल्वा म्हणाला, मला माझ्या क्षमतेवर पूर्ण विश्वास होता. संघाला विजय मिळवून देण्याची जिद्द मनात होती. आजचा दिवस माझा होता.

भगवान बिरसा मुंडा : आदिवासी स्वाभिमानाचे महानायक

भारतीय इतिहासाच्या पानांवर अनेक क्रांतिकारकांनी आपल्या शौर्याची आणि त्यागाचा ठसा उमटवला आहे. अशाच महान क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे भगवान बिरसा मुंडा! आदिवासी समाजाचे हक्क, स्वाभिमान, संस्कृती आणि अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रखर संघर्ष केला. अत्यंत कमी वयात त्यांनी केलेले कार्य आजही संपूर्ण देशाला प्रेरणा देणारे आहे. भगवान बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलिहातू या गावात झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू होते. लहानपणापासूनच त्यांना समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण जवळून अनुभवायला मिळाले. आदिवासी समाजाचे साधे, कष्टमय जीवन आणि त्यांच्या जमिनीवर होणारे अतिक्रमण यामुळे त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची भावना निर्माण झाली.

त्या काळात ब्रिटिश सरकार, जमीनदार आणि सावकार आदिवासींचे शोषण करत होते. आदिवासींच्या जमिनी हिरावून घेतल्या जात होत्या. त्यांच्या पारंपरिक हक्कांवर गदा आणली जात होती. जल, जंगल आणि जमीन यांच्याशी नाळ जोडलेल्या आदिवासी समाजाचे अस्तित्व धोक्यात आले होते. ही परिस्थिती पाहून बिरसा मुंडा यांनी आदिवासी बांधवांना संघटित करण्याचे कार्य सुरू केले. त्यांनी आदिवासी समाजात सामाजिक जागृती निर्माण केली. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक कुप्रथांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. शिक्षण, स्वच्छता, एकता आणि स्वाभिमान यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या विचारांनी आदिवासी समाजात नवचैतन्य निर्माण झाले. लोक त्यांना प्रेमाने 'धरती आबा' म्हणजेच धरतीचा पिता असे संबोधू लागले. १८९९ ते १९०० या काळात त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध उलगुलान म्हणजेच महान आदिवासी उठावाचे नेतृत्व केले. हा उठाव केवळ ब्रिटिशांविरुद्धचा संघर्ष नव्हता, तर तो आदिवासींच्या हक्कांचा, अस्मितेचा आणि स्वातंत्र्याचा लढा होता. आपल्या मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी त्यांनी हजारो आदिवासी बांधवांना एकत्र आणले. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजात अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य निर्माण झाले.

- सौ. माधुरी धनोकार, अकोला

वैध मापनशास्त्र विभागाची कार्यप्रणाली नेमकी कशी चालते?

शासनाचे धोरण, अधिकाऱ्यांची जबाबदारी आणि ग्राहकांचे अधिकार समजून घेणे काळाची गरज!, ना जास्त, ना कमी! प्रत्येक व्यवहारात अचूक वजन आणि अचूक माप, हीच ग्राहक संरक्षणाची खरी ओळख!

लेखक
हेमंत अटळकर



आपल्या दैनंदिन जीवनात सकाळी दूध खरेदी करण्यापासून ते किराणा सामान, भाजीपाला, पेट्रोल-डिझेल, सोन्या-चांदीची खरेदी, कृषी उत्पन्न बाजार समित्या, औद्योगिक व्यवहार आणि मोठ्या व्यापारी देवाणघेवाणीपर्यंत प्रत्येक ठिकाणी वजन आणि मापांचा वापर केला जातो. या प्रत्येक व्यवहारात ग्राहकाला योग्य वजन, योग्य माप आणि योग्य प्रमाण मिळावे, यासाठी शासनाने वैध मापनशास्त्र विभागाची स्थापना केली आहे.

वैध मापनशास्त्र विभाग हा केवळ वजनकाट्यांची तपासणी करून त्यावर मुद्रांकन करणारा विभाग नाही, तर देशातील व्यापारव्यवस्थेत विश्वास, पारदर्शकता आणि आर्थिक न्याय टिकवून ठेवणारी एक महत्त्वपूर्ण शासकीय यंत्रणा आहे. मात्र या विभागाची कार्यप्रणाली नेमकी काय आहे? शासनाचे धोरण काय आहे? कायदे आणि नियम कसे लागू होतात? अधिकाऱ्यांची कर्तव्ये कोणती? व्यापारी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांनी कोणती भूमिका बजावली पाहिजे? या सर्व बाबी समजून घेणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे.

१. वैध मापनशास्त्र विभागाची कार्यप्रणाली कशी असते?

वैध मापनशास्त्र विभाग हा महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत कार्यरत आहे. या विभागाचे प्रमुख नियंत्रक, वैध मापनशास्त्र हे असतात. त्यांच्या अधिपत्याखाली विभागीय, प्रादेशिक आणि जिल्हास्तरीय अधिकारी तसेच निरीक्षक कार्य करतात. या विभागाची प्रमुख जबाबदारी म्हणजे बाजारपेठेत वापरल्या जाणाऱ्या वजन-माप उपकरणांची अचूकता सुनिश्चित करणे, त्यांची नियमानुसार पडताळणी व मुद्रांकन करणे आणि ग्राहकांची फसवणूक रोखणे.

या विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, पारंपरिक वजनकाटे, औद्योगिक वजनकाटे, वाहन काटे, पेट्रोल पंपांवरील मापन उपकरणे तसेच इतर व्यापारी व्यवहारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या मापन उपकरणांची तपासणी केली जाते. याशिवाय उत्पादक, विक्रेते, आयातदार, पॅकर्स आणि दुरुस्तीदार यांच्या कामकाजावर कायद्यानुसार नियंत्रण ठेवणे, बाजारपेठेतील अचानक तपासणी करणे आणि तक्रारींवर कार्यवाही करणे हीदेखील या विभागाची महत्त्वाची कामे आहेत. या विभागाचे मूळ उद्दिष्ट एकच आहे की, कोणत्याही ग्राहकाची किंवा शेतकऱ्याची वजन-मापाच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक होऊ नये.

२. शासनाचे धोरण काय आहे?

भारत सरकारने संपूर्ण देशात वजन आणि मापांच्या व्यवहारांमध्ये एकसमानता, अचूकता आणि विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ लागू केला. या कायद्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०११ पासून सुरू झाली.या कायद्याचा मुख्य उद्देश ग्राहकांचे हित जपणे, व्यापारी व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणणे, वजन-माप उपकरणांची अचूकता निश्चित करणे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे हा आहे. शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक व्यापारी व्यवहारात प्रमाणित वजन आणि मापांचा वापर होणे आवश्यक आहे. कोणत्याही वजनकाट्यामध्ये अनधिकृत फेरफार होऊ नये, पॅकबंद वस्तूंवर आवश्यक माहिती नमूद असावी आणि ग्राहकांना त्यांच्या पैशाच्या मोबदल्यात योग्य प्रमाणात वस्तू मिळाव्यात, यासाठी कायदेशीर व्यवस्था करण्यात आली आहे. केंद्र शासन मापनसंबंधी धोरणे आणि मानके निश्चित करते, तर राज्य शासन आपल्या वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत त्यांची अंमलबजावणी करते.

३. कायदे आणि नियम प्रत्यक्षात कसे काम करतात?

वैध मापनशास्त्र विभागाचे काम विविध कायदे आणि नियमांच्या आधारे चालते. त्यातील प्रमुख कायदे आणि नियम पुढीलप्रमाणे आहेत.

१. Legal Metrology Act, 2009 – वजन-मापांचे नियमन आणि कायद्याची अंमलबजावणी.

२. Legal Metrology (General) Rules, 2011 - वजन-माप उपकरणांसाठी आवश्यक तांत्रिक निकष.

३. Legal Metrology (Packaged Commodities) Rules, 2011 - पॅकबंद वस्तूंवरील आवश्यक घोषणांसंबंधी नियम.

४. Legal Metrology (Approval of Models) Rules, 2011 - वजन-माप उपकरणांच्या मॉडेलला मान्यता देण्याची प्रक्रिया.

५. Legal Metrology (Nationsl Standards) Rules, 2011 – राष्ट्रीय मापन मानकांसंबंधी तरतुदी.

६. Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011 – महाराष्ट्रातील कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी नियम.

या कायद्यांमध्ये वजन-माप उपकरणांचे उत्पादन, विक्री, दुरुस्ती, वापर, पडताळणी, मुद्रांकन आणि तपासणी यासंबंधी स्पष्ट तरतुदी आहेत. विशेषतः कलम २४ नुसार व्यापार किंवा व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या वजन-माप उपकरणांची वापरापूर्वी नियमानुसार पडताळणी करून घेणे आणि निर्धारित कालावधीत पुनर्पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

कलम १८ पॅकबंद वस्तूंवरील आवश्यक घोषणांशी संबंधित आहे, तर कलम २२ मॉडेल मान्यतेशी आणि कलम २३ परवाना व नोंदणीसंबंधी आवश्यकतांशी संबंधित आहे. म्हणजेच केवळ वजनकाटा खरेदी करून दुकानात ठेवणे पुरेसे नाही. तो कायदेशीर मानकांनुसार कार्यरत आहे आणि त्याची आवश्यक पडताळणी झालेली आहे, याची खात्री करणे ही संबंधित वापरकर्त्याची जबाबदारी आहे.

४. वैध मापनशास्त्र अधिकाऱ्यांची जबाबदारी काय?

या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजे वैध मापनशास्त्र विभागातील अधिकारी आणि कर्मचारी. शासनाने अधिकाऱ्यांना कायदेशीर अधिकार दिले आहेत, त्याचबरोबर त्यांच्यावर जनतेप्रती कर्तव्येही निश्चित केली आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी म्हणजे आपल्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे, अधीनस्थ अधिकाऱ्यांच्या कामाचा नियमित आढावा घेणे, तक्रारींवर वेळेत निर्णय घेणे, क्षेत्रीय तपासणीवर देखरेख ठेवणे आणि शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे. त्याचप्रमाणे क्षेत्रीय निरीक्षकांनी बाजारपेठा, कृषी उत्पन्न बाजार समित्या, पेट्रोल पंप, किराणा दुकाने, औद्योगिक आस्थापना आणि व्यापारी प्रतिष्ठानांची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. वजनकाट्यांची अचूकता तपासणे, मुद्रांकनाची वैधता पाहणे, वजनात हेराफेरी होत आहे का याची चौकशी करणे, पॅकबंद वस्तूंच्या घोषणांची तपासणी करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करणे ही त्यांची प्रमुख कर्तव्ये आहेत. अधिकाऱ्यांनी आपल्या नियुक्त मुख्यालयात नियमानुसार उपस्थित राहणे, शासनाने दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे, नागरिकांच्या तक्रारींना प्रतिसाद देणे आणि क्षेत्रीय कामकाज नियमितपणे करणे आवश्यक आहे. सरकारी पद म्हणजे केवळ अधिकार गाजवण्याचे साधन नाही, तर ते जनतेच्या पैशातून चालणारे सार्वजनिक उत्तरदायित्वाचे पद आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे पक्षपात, संगनमत, दुर्लक्ष किंवा अधिकारांचा गैरवापर होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

५. व्यापारी, उत्पादक आणि वजनकाटा वापरणाऱ्यांची जबाबदारी

वैध मापनशास्त्र विभागाने कितीही प्रभावी तपासणी केली, तरी व्यापारी वर्गाने कायद्याचे पालन केले नाही तर ग्राहकांचे संपूर्ण संरक्षण होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येक व्यापारी, उत्पादक आणि वजनकाटा वापरणाऱ्याने पुढील बाबींचे पालन करणे आवश्यक आहे.

१. व्यापारात वापरला जाणारा वजनकाटा कायदेशीर मानकांनुसार असावा.

२. वजनकाट्यांची नियमानुसार पडताळणी आणि मुद्रांकन करून घ्यावे.

३. मुद्रांकनाची वैधता संपल्यानंतर निर्धारित प्रक्रियेनुसार पुनर्पडताळणी करून घ्यावी.

४. वजनकाट्यामध्ये रिमोट, इलेक्ट्रॉनिक चिप, सॉफ्टवेअर किंवा अन्य माध्यमातून वजन बदलण्याची कोणतीही अनधिकृत व्यवस्था ठेवू नये.

५. ग्राहकासमोर वजनकाटा योग्य प्रकारे वापरावा.

६. पॅकबंद वस्तूंवर आवश्यक कायदेशीर माहिती नमूद करावी.

७. वजनकाटा दुरुस्तीसाठी आवश्यक परवाना असलेल्या अधिकृत दुरुस्तीदाराची मदत घ्यावी.

८. तपासणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना कायद्यानुसार आवश्यक सहकार्य करावे.

विशेषतः कृषी उत्पन्न बाजार समित्या, धान्य बाजार, भाजीपाला बाजार आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये वजनाच्या व्यवहारात पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण वजनातील छोटीशी हेराफेरीदेखील मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करू शकते.

६. ग्राहकांची जबाबदारी आणि त्यांचे अधिकार

ग्राहक संरक्षण हा या विभागाच्या अस्तित्वाचा मुख्य उद्देश आहे. मात्र ग्राहकांनीसुद्धा जागरूक राहणे आवश्यक आहे.

प्रत्येक ग्राहकाने वस्तूचे वजन करून घेताना वजनकाट्याचा डिस्प्ले स्वतः पाहावा. वजनकाट्यावर शून्य दर्शविले जात आहे का, याची खात्री करावी. वजनकाट्यावर वैध मुद्रांकन आहे का, हे तपासावे. पॅकबंद वस्तू खरेदी करताना निव्वळ वजन, कमाल किरकोळ किंमत, उत्पादन व पॅकिंगची माहिती आणि इतर आवश्यक घोषणांची तपासणी करावी. पेट्रोल पंपावर इंधन भरताना मीटर शून्यावरून सुरू झाले आहे का, हे पाहावे. कमी वजन किंवा चुकीचे माप दिल्याचा संशय आल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. खरेदीची पावती घ्यावी आणि उपलब्ध पुरावे जतन करावेत. ग्राहकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की योग्य वजन मिळणे ही कोणत्याही व्यापाऱ्याची मेहरबानी नसून ग्राहकांचा कायदेशीर अधिकार आहे.

७. सर्वसामान्य जनतेची जबाबदारी काय?

वैध मापनशास्त्र विभाग हा केवळ व्यापारी आणि अधिकाऱ्यांपुरता मर्यादित विषय नाही. समाजातील प्रत्येक व्यक्ती या व्यवस्थेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भाग आहे. शेतकरी, कामगार, महिला, छोटे व्यावसायिक, ग्राहक संघटना, सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमे या सर्वांनी या व्यवस्थेवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

बाजारपेठेतील वजन-मापातील गैरप्रकारांविषयी जागरूक राहणे, कमी वजन किंवा चुकीचे माप दिले जात असल्यास तक्रार करणे, शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या वजनात होणाऱ्या संभाव्य गैरप्रकारांकडे लक्ष देणे आणि इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांमध्ये संशयास्पद फेरफार दिसल्यास संबंधित विभागाला माहिती देणे ही जनतेची सामाजिक जबाबदारी आहे. सामाजिक संस्था आणि ग्राहक संघटनांनी जनजागृती करावी. प्रसारमाध्यमांनी पुराव्यांच्या आधारे जनहिताचे प्रश्न उपस्थित करावेत. तसेच अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची मागणी करावी. जनतेने केवळ तक्रार करून थांबू नये, तर तक्रारीवर काय कार्यवाही झाली याचाही पाठपुरावा करावा.

८. आधुनिक वजनकाट्यांमधील तांत्रिक गैरप्रकार आणि विभागाची भूमिका

आजच्या आधुनिक युगात इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांचे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहे. पूर्वी पारंपरिक वजनकाट्यांमध्ये भौतिक बदल करून फेरफार केले जात होते. आता इलेक्ट्रॉनिक सर्किट, सॉफ्टवेअर, रिमोट कंट्रोल, अनधिकृत चिप किंवा इतर तांत्रिक साधनांचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या गैरप्रकारांमुळे शेतकरी, ग्राहक आणि व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे वैध मापनशास्त्र विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तपासणी अधिक सक्षम करण्याची गरज आहे. संशयास्पद वजनकाट्यांची तांत्रिक तपासणी, आवश्यकतेनुसार इलेक्ट्रॉनिक सर्किट आणि सॉफ्टवेअरची तपासणी, रिमोट कंट्रोल किंवा अनधिकृत उपकरणांचा शोध, तक्रारींच्या आधारे विशेष तपासणी मोहीम आणि दोषी व्यक्तींविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. वजनकाट्याचे मुद्रांकन झाले म्हणजे तो कायमस्वरूपी सुरक्षित आहे, असे समजणे चुकीचे आहे. मुद्रांकनानंतर अनधिकृत फेरफार झाला असल्यास त्याची पुन्हा तपासणी करणे आवश्यक आहे.

९. विभागाच्या कार्यक्षमतेसाठी कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत?

वैध मापनशास्त्र विभाग अधिक प्रभावी करण्यासाठी शासनाने काही महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

१. प्रत्येक मुख्यालयात अधिकाऱ्यांची उपलब्धता असावी. नागरिकांना आपल्या कामासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत.

२. रिक्त पदे तातडीने भरली पाहिजेत. अधिकारी आणि कर्मचारी अपुरे असल्यास तपासणी, मुद्रांकन आणि तक्रार निवारणाच्या कामावर परिणाम होतो.

३. प्रत्येक जिल्ह्यात नियमित आणि अचानक तपासणी मोहीम राबविली पाहिजे.

४. प्रत्येक तक्रारीला नोंदणी क्रमांक, कार्यवाहीची माहिती आणि निर्णयाची स्पष्ट नोंद मिळाली पाहिजे.

५. इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, औद्योगिक वजनकाटे आणि वाहन काटे यांच्या तपासणीसाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध असाव्यात.

६. विभागातील अधिकारी, उत्पादक, विक्रेते आणि दुरुस्तीदार यांच्यातील व्यवहार कायद्याच्या चौकटीत असावेत. कोणत्याही प्रकारचे संगनमत किंवा अनधिकृत आर्थिक व्यवहार होऊ नयेत.

७. विभागाच्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन शासनाने त्याची कार्यक्षमता आणि जनतेला मिळणाऱ्या सेवांचा अभ्यास केला पाहिजे.

८. आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना विशेष तांत्रिक प्रशिक्षण दिले पाहिजे.

१०. जनतेने तक्रार कुठे आणि कशी करावी?

महाराष्ट्रातील नागरिकांना वैध मापनशास्त्र विभागाकडे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तक्रार करताना दुकान, व्यापारी किंवा आस्थापनेचे नाव व पत्ता, गैरप्रकार घडल्याची तारीख आणि वेळ, संबंधित वजनकाट्याची माहिती, खरेदीची पावती आणि उपलब्ध छायाचित्रे किंवा व्हिडिओ असे पुरावे देणे उपयुक्त ठरते. महाराष्ट्र वैध मापनशास्त्र विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांसाठी विभागाची माहिती, कायदे, नियम, परवाने आणि इतर आवश्यक माहिती उपलब्ध आहे.

अधिकृत संकेतस्थळ : https://legalmetrology.maharashtra.gov.in/

नागरिकांनी आपल्या तक्रारी संबंधित वैध मापनशास्त्र कार्यालयात लेखी स्वरूपात सादर करून त्याची पोहोच घ्यावी आणि आवश्यकतेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा.

११. निष्कर्ष : सक्षम वैध मापनशास्त्र विभाग ही काळाची गरज!

वैध मापनशास्त्र विभाग हा शासनाच्या प्रशासकीय व्यवस्थेतील एक महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाच्या कार्यक्षमतेवर बाजारपेठेतील विश्वासार्हता, शेतकऱ्यांचे आर्थिक हित, ग्राहकांचे संरक्षण आणि व्यापारी व्यवहारांची पारदर्शकता अवलंबून आहे. या व्यवस्थेत शासनाने कायदे केले, नियम तयार केले आणि अधिकाऱ्यांना अधिकार दिले. परंतु या कायद्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, यावरच संपूर्ण व्यवस्थेचे यश अवलंबून आहे. अधिकारी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत असतील, व्यापारी कायद्याचे पालन करत असतील, ग्राहक जागरूक असतील आणि नागरिक गैरप्रकारांविरुद्ध आवाज उठवत असतील तरच या विभागाचा मूळ उद्देश सफल होईल. आज गरज आहे ती केवळ कार्यालयीन कामकाजाची नाही, तर प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून काम करणाऱ्या, आधुनिक तंत्रज्ञानाची जाण असलेल्या, भ्रष्टाचारमुक्त आणि उत्तरदायी यंत्रणेची.

शासनाने अधिकाऱ्यांना अधिकार दिले आहेत, पण त्या अधिकारांचा उपयोग जनतेच्या हितासाठी होणे हीच खरी प्रशासकीय जबाबदारी आहे.

शेवटी एकच संदेश

ना जास्त, ना कमी! प्रत्येक व्यवहारात अचूक वजन आणि अचूक माप! ग्राहकांचे संरक्षण, शेतकऱ्यांचे हित आणि पारदर्शक व्यापार हीच वैध मापनशास्त्र विभागाची खरी ओळख!

लेखाचा उद्देश : वैध मापनशास्त्र विभागाची कार्यप्रणाली, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि नागरिकांमधील जनजागृती वाढविणे आहे.

- ९८२२४७२५७१

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

विद्यार्थ्यांनो, डिजिटल शिक्षणातून संधींचे सोने करा: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाज्योती आणि वनार्टीच्या विद्यार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शैक्षणिक टॅबलेटचे वितरण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आजच्या डिजिटल युगात गुणवत्तेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळणे ही काळाची गरज बनली आहे. शिक्षणाच्या पारंपरिक चौकटी ओलांडून डिजिटल माध्यमातून ज्ञानाची नवी दालने खुली झाली असून, विद्यार्थ्यांसाठी शिकण्याच्या आणि स्वतःला सिद्ध करण्याच्या असंख्य संधी उपलब्ध झाल्या आहेत. ऑनलाइन व्याख्याने, डिजिटल अभ्यास साहित्य, आधुनिक संदर्भ साधने आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक व्यापक व सुलभ झाले आहे. विशेषतः वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या माध्यमांचा मोठा फायदा होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी उपलब्ध डिजिटल साधनांचा विधायक वापर करून ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करावा. या संधींचे सोने करीत स्पर्धात्मक युगात स्वतःला सिद्ध करावे आणि आपल्या गुणवत्तेचा बळावर यशाची नवी शिखरे गाठावीत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या स्वायत्त संस्था महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या जेईई/नीट/एमएचसीईटी-सीईटी परीक्षा पूर्व प्रशिक्षण (२०२६-२८) अंतर्गत नागपूर विभागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपयोगासाठी टॅबलेटचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्यमंत्री सचिवालयात करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आणि 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ग्रामीण तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकीसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि दर्जेदार शैक्षणिक साहित्य आवश्यक असते. शासनाच्या प्रशिक्षण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घेत आपल्या शैक्षणिक ध्येयपर्यंत पोहोचावे. टॅबलेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्याख्याने, अभ्यास साहित्य, सराव परीक्षा आणि विविध शैक्षणिक संदर्भ साधनांचा लाभ घेता येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे शिक्षणाच्या पद्धती बदलत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेपुरता अभ्यास न करता आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञानही आत्मसात करावे. उपलब्ध सुविधांचा योग्य वापर करून आत्मविश्वासाने स्पर्धेला सामोरे जावे आणि आपल्या यशातून इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणा निर्माण करावी, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत 'महाज्योती'चे लाभार्थी विद्यार्थी निशांत राम राऊत, किर्तिका मंगेश नाकाडे, नैतिक नरेंद्र नवघरे आणि दर्श संजय मेहर, तर 'वनार्टी'चे लाभार्थी विद्यार्थी चेतन सुधीर लोंढे, विधी एकनाथ पवार आणि क्रितीका मंगेश नाकाडे यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शैक्षणिक टॅबलेट प्रदान करण्यात आले.

बल्लारपुरात छठ पूजेचा भक्तिमय उत्साह : आज अस्ताला जाणाऱ्या सूर्याला अर्घ्य अर्पण



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

उत्तर भारतीय समाजाच्या श्रद्धेचे प्रतीक असलेला चार दिवसीय छठ पूजा महोत्सव बल्लारपूर येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा केला जात आहे. नहाय-खाय आणि खरना पूजन विधी पार पडल्यानंतर रविवार, १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अस्ताला जाणाऱ्या सूर्यदेवाला पहिले अर्घ्य अर्पण केले जाणार आहे. तर सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी सकाळी उगवत्या सूर्याला अर्घ्य देऊन या पवित्र व्रताची सांगता होणार आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी येथील वेकोलि कॉलनी छठ घाट तसेच राजुरा मार्गावरील वर्धा नदीच्या घाटावर जय्यत तयारी करण्यात आली आहे. रविवारी सूर्यास्ताच्या वेळी महिला व्रतींसह नागरिक मोठ्या संख्येने घाटावर एकत्र येऊन सूर्यदेवाला जल अर्पण करणार असून फळे, फुले आणि पारंपरिक प्रसादाचा नैवेद्य दाखवून कुटुंबाच्या सुख-समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना करणार आहेत.

छठ पूजा हा अत्यंत कठीण आणि पवित्र सण मानला जातो. या व्रतामध्ये व्रती सलग ३६ तास निर्जला उपवास करतात. सूर्यदेव आणि छठी मैयाची आराधना करण्यासाठी विविध फळे, फुले, कंदमुळे, तुपाचे दिवे, मातीचे दीप तसेच बांबूच्या सूपाचा वापर केला जातो. शुद्ध गव्हाचे पीठ आणि गुळापासून तयार करण्यात येणारा पारंपरिक ठेकुआ हा या पूजेतील विशेष प्रसाद असतो. या संपूर्ण पूजाविधीत कुटुंबातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण श्रद्धेने सहभागी होऊन एकमेकांना सहकार्य करतात. छठ पूजेची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. पौराणिक कथांनुसार, त्रेतायुगात माता सीता, तर द्वापारयुगात द्रौपदी आणि सूर्यपुत्र कर्ण यांनी सूर्योपासना केल्याचे उल्लेख आढळतात. ऋग्वेदातही सूर्याला प्रत्यक्ष दर्शन देणारी देवता मानून त्याची उपासना करण्यात आली आहे. याच प्राचीन धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन छठ पूजेच्या माध्यमातून आजही घडत आहे. बल्लारपूर परिसरात या महोत्सवामुळे सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, घाटांवर होणाऱ्या सामूहिक सूर्योपासनेची भाविकांना उत्सुकता लागली आहे. श्रद्धा, संयम, निसर्गपूजा आणि कौटुंबिक एकतेचा संदेश देणारा हा छठ पूजा महोत्सव उत्तर भारतीय समाजासाठी विशेष महत्त्वाचा ठरत आहे.

ग्रंथभारती दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे.वाचनाने विस्तारित दृष्टी मिळते वाचनसंस्कृती आणि लेखन संस्कृती समाजात रुजवणे आवश्यक आहे असे प्रतिपादन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी केले.



ग्रंथालयाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या ग्रंथालय भारती या संस्थेचे मुखपत्र असलेल्या ग्रंथ भारतीचा दिवाळी अंक विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथ सहवास आणि ग्रंथालय भारती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गिरीश गांधी यांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर ग्रंथालय भारती चे केंद्रीय कार्याध्यक्ष रवींद्र गोविंद पांडे,साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक संघाचे कार्यकारिणी सदस्य श्री बाळ कुलकर्णी, अभिव्यक्ती च्या अध्यक्षा स्वाती सुरंगळीकर उपस्थित होते. सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी लेखकांकडून सकस लेखन व्हायला हवे अशी मत व्यक्त करत डॉ गांधी म्हणाले, लेखकांनी समाजाच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन लेखन करायला हवे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्याध्यक्ष रवींद्र गोविंद पांडे यांनी ग्रंथालय भारतीचे कार्य, उद्देश आणि भूमिका मांडली.या कार्यक्रमात अंकासाठी भरीव कार्य केलेल्या संपादक मंडळातील सदस्या अलका मोकाशी, निकिता गावंडे यांचा ग्रंथभेट देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे केंद्रीय सहसचिव श्री श्रीपाद देशपांडे यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथ सहवासच्या संचालिका डॉ स्वाती मोहरीर यांनी केले. या कार्यक्रमाला कोषाध्यक्ष श्री वामन निचते, संस्थेचे महानगर अध्यक्ष श्री प्रशांत तुंगार, उपाध्यक्ष चित्रा देशपांडे, सुरेश विंचूरकर, प्रकाश एदलाबादकर,रवी वाघमारे,माधुरी साकुळकर शुभदा फडणवीस, ग्रंथपाल माधुरी वाडीभस्मे,मोनाली पोफरे इतर साहित्यिक आणि ग्रंथालय भारती चे सभासद मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

कंडक्टरशिवाय धावली काटोल-नागपूर एसटी बस!

चालकानेच काढली प्रवाशांची तिकिटे, एसटी महामंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एसटी महामंडळाची बस म्हटले की चालक आणि वाहक (ड्रायव्हर व कंडक्टर) ही दोन महत्त्वाची पदे सर्वांच्या डोळ्यांसमोर येतात. मात्र, रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर रोजी काटोल ते नागपूर मार्गावर एसटी महामंडळाची बस चक्क वाहकाशिवाय धावत असल्याचा प्रकार समोर आला. काटोल येथून दुपारी ३.३० वाजता नागपूरकडे रवाना होणाऱ्या एसटी बसमध्ये वाहक उपस्थित नसल्याने चालकानेच प्रवाशांची तिकिटे काढण्याची



जबाबदारी पार पाडली. विशेष म्हणजे, चालकाने सुरुवातीला सर्व प्रवाशांची तिकिटे काढली आणि त्यानंतर बस कोणत्याही थांब्यावर न थांबवता थेट नागपूरपर्यंत नेली.

या प्रकारामुळे एसटी महामंडळाच्या नियोजनावर आणि कामकाजाच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बससेवेमध्ये चालकाइतकेच वाहकाचेही महत्त्वाचे स्थान आहे. प्रवाशांना तिकिटे देणे, विविध थांब्यांवर उतरणाऱ्या प्रवाशांची माहिती चालकाला देणे तसेच प्रवासादरम्यान प्रवाशांच्या सोयी-सुविधांकडे लक्ष देणे ही वाहकाची महत्त्वाची जबाबदारी असते. मात्र, या बसमध्ये वाहकच नसल्यामुळे चालकाला एकट्यालाच तिकिटे काढण्यासह इतर जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागल्या. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा प्रकार चिंताजनक ठरू शकतो. एसटी महामंडळाने अशा प्रकारांची दखल घेऊन चालक आणि वाहकांची पुरेशी व्यवस्था करावी, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

नागपूर जिल्हा शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार, प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी बदलले प्रशिक्षणस्थळ!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संपूर्ण महाराष्ट्रात १३ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीत शिक्षकांसाठी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने नागपूर शहरातही १३ नोव्हेंबरपासून प्रशिक्षणाला सुरुवात झाली. मात्र, प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी नियोजनातील त्रुटी आणि प्रशासकीय समन्वयाच्या अभावामुळे शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार समोर आला.

अजनी परिसरातील एका शाळेत प्रशिक्षणासाठी केंद्र निश्चित करण्यात आले होते. मात्र, तेथे आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचे पहिल्याच दिवशी निदर्शनास आले. नागपूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि नागपूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले.

या प्रशिक्षणासाठी मार्गदर्शकांची व्यवस्था करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे, तर प्रशिक्षणस्थळ निश्चित करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद शिक्षण



विभागाकडे होती. मात्र, दोन्ही यंत्रणांमधील योग्य समन्वयाअभावी प्रशिक्षणस्थळी गैरसोयींचा सामना शिक्षकांना करावा लागला.

प्रशिक्षणासाठी दोन वर्गखोल्या निश्चित करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात संबंधित शाळेकडून केवळ एका वर्गखोलीची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे दुसऱ्या वर्गातील प्रशिक्षणार्थी शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. अखेर बराच वेळ उलटल्यानंतर दुसऱ्या वर्गाची व्यवस्था करण्यात आली; मात्र तेथेही शिक्षकांना बसण्यासाठी पुरेशा खुर्च्या उपलब्ध नव्हत्या. प्रशिक्षणासारख्या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे नियोजन करताना आवश्यक मूलभूत सुविधांची खातरजमा करणे अपेक्षित असताना, प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या दिवशीच अशा त्रुटी समोर आल्याने शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. शिक्षकांना झालेल्या गैरसोयींबाबत शिक्षण विभागाकडे सूचना आणि तक्रारी पोहोचल्यानंतर अखेर ऐनवेळी प्रशिक्षणस्थळ बदलण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे जिल्हा शिक्षण विभागाच्या पूर्वनियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशिक्षणाचे नियोजन करताना संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय आणि मूलभूत सुविधांची खातरजमा का करण्यात आली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

थोडक्यात

हृदयविकाराने पोलीस हवालदार अतुल चहारे यांचे निधन, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर - धनंजय पांढरे

चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले विठ्ठल मंदिर वॉर्ड निवासी पोलीस हवालदार अतुल दौलतराव चहारे ४५ वर्ष यांचे १४ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने चंद्रपूर पोलीस दलासह विठ्ठल मंदिर वॉर्ड परिसरात शोककळा पसरली आहे. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. अतुल चहारे हे सर्वांच्या परिचयाचे आणि आपुलकीने अतुल काका म्हणून ओळखले जाणारे व्यक्तिमत्त्व होते.



पोलीस सेवेत कर्तव्य बजावतानाच ते उत्कृष्ट मल्लखांब खेळाडू म्हणूनही परिचित होते. मनमिळाऊ स्वभाव आणि सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांनी अनेकांच्या मनात स्थान निर्माण केले होते.१५ नोव्हेंबर रोजी पठाणपुरा स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १२ वर्षांचा मुलगा, १० वर्षांची मुलगी, आई-वडील आणि मोठा आप्तपरिवार आहे. दोन लहान मुलांच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरपल्याने हळहळ व्यक्त होत आहे. अतुल काका यांच्या अकाली निधनाने कुटुंबीयांसह पोलीस सहकारी आणि विठ्ठल मंदिर वॉर्डातील नागरिकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

राजोली येथे दोन दिवसीय मंडई कार्यक्रमाचा 'कोल्हापूरचा झिंगाट' या मराठमोळी लावणीच्या कार्यक्रमाने आज समारोप

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

नवयुवक सांस्कृतिक मंडई महोत्सव मंडळ राजोली तर्फे आज रविवार (ता. १५ नोव्हेंबर) सायं.७ वाजता पासून दोन दिवसीय मंडईची सुरुवात बाजार चौक राजोली येथे वाशिम येथील निंबाजी तागड महाराज यांच्या भारुड चा कार्यक्रम झाली असून, उद्या सोमवार (ता.१६ नोव्हेंबर)ला सकाळी १० वाजता पासून ते सायंकाळपर्यंत शाहीर पुरुषोत्तम खाडेकर विरुद्ध शाहीर राजहंस देवगडे यांच्या दुय्यम खडा तमाशा, तर रात्री ९ वाजता कोल्हापूरच्या झिंगाट या मराठमोळी लावण्याच्या कार्यक्रमाने समारोप होणार आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटनाला गावातील, परिसरातील, तालुक्यातील व जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवयुवक सांस्कृतिक मंडई महोत्सव मंडळाचे अध्यक्ष रवी वानखेडे, उपाध्यक्ष रवी पोटभरे, सचिव चेतन आंबिलढुके, सहसचिव वैभव श्रावणकर, कोषाध्यक्ष अजय श्रावणकर, सह समस्त सदस्य गण परिश्रम घेत असून सर्व ग्रामवासी सहकार्य करत आहेत. या मंडई महोत्सवाचा लाभ घेण्याचे आव्हान ग्रामपंचायत राजोली सरपंच योगेश महादुले सह समस्त सदस्यगणांनी केले आहे.

वार्षिक जनरल हवन कार्यक्रम, मौदा आश्रम येथे सेवकांची गर्दी, स्वयंसेवकांचे श्रमदान



दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ वर्धमान नगर येथे आज (ता. १५) रविवारला वार्षिक जनरल हवन कार्य मंडळाचे अध्यक्ष रवींद्र गायधने,उपाध्यक्ष देवराव तुमसरे, सचिव किरण राऊत, कोषाध्यक्ष सुभाष दहिकर, संचालक रवींद्र खापरे संचालक महेंद्रसिंग गुरुबले, संचालक हेमराज शिदिकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या जीवनावर जगन्नाथ सोनकुसरे यांच्या चमुने भजन कार्यक्रम पार पाडले. चर्चा सत्रमध्ये बाबांच्या जीवनावर प्रकाश टाकून मार्गदर्शन करण्यात आले चर्चा सत्राचे अध्यक्ष व मंडळाचे अध्यक्ष रवींद्र गायधने यांनी बाबांनी दिलेल्या तत्व शब्द, नियम व सेवकांना आलेले अनुभव ह्यावर मार्गदर्शन केले. त्यानिमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. ह्यावेळी अनेक सेवक वर्धमान नगर येथील सांस्कृतिक भवन येथे आणि मौदा येथील परमपूज्य परमात्मा एक सेवक मानव धर्म आश्रम येथे सेवकांची अतूट गर्दी होती.

मौदा आश्रम येथील आम्ही स्वयंसेवक ग्रुप आश्रम मौदा यांनी आज दिवसभर परिश्रम करून येणाऱ्या जाणाऱ्या सेवकांना सुविधा पुरविण्यात आल्या. मौदा परिसरातील परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळाचे संचालक तापेश्वर वैद्य, माथनी मार्गदर्शक दिलीप वाडिभस्मे, धामणगाव मार्गदर्शक मदन पंचबुधे, तेलीमांगली मार्गदर्शक डांगरे यांनी स्वयंसेवकांचे आभार मानले.

सालवा येथे दिव्यांग व गरजूंना आनंदाचा शिधावाटप

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली 'आनंदाचा शिधा... दिव्यांग व गरजूंच्या दारी' या संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्या उपक्रमाचे आयोजन सालवा येथेही करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य तथा शिवसेना शाखाप्रमुख सुनील कारेमोरे यांनी गावातील अंध व गरजू लोकांना आनंदाचे शिधावाटप केले. यंदा शिवसेनेतर्फे राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे तालुक्यातील दिव्यांग, विधवा व गरजू नागरिकांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचेआभार मानले आहे.



थोडक्यात

लोगो अनावरण आणि खेळाडूंचा लिलाव १७ नोव्हेंबरला

एमकेएम खो-खो प्रीमियर लीग - सीझन ३

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एमकेएम खो-खो प्रीमियर लीगच्या तिसऱ्या पर्वाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली असून, या स्पर्धेच्या लोगो अनावरण आणि खेळाडूंच्या लिलाव सोहळ्याचे आयोजन १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून धनवटे नॅशनल कॉलेजच्या एमबीए भवन, काँग्रेसनगर, नागपूर येथे होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे नागपूर विभागाचे उपसंचालक महादेव कासगावडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. सरस्वती विद्यालय, नागपूरच्या मुख्याध्यापिका डॉ. रेश्मी उमेश कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील, तर महाराष्ट्र क्रीडा मंडळ, नागपूरचे अध्यक्ष अॅड. सुमंत चितळे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. महाराष्ट्र क्रीडा मंडळ, नागपूर यांच्या वतीने आयोजित ही स्पर्धा ४ ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत होत आहे.

लीगच्या तिसऱ्या पर्वात सहा संघ विजेतेपदासाठी मैदानात उतरणार आहेत. यामध्ये एमकेएम डिफेंडर्स, स्विफ्ट पँथर्स, राजमुद्रा वॉरियर्स, ऑरेंजसिटी लायन्स, स्पोर्ट्स कर्मा आणि निर्मय घुरंधर या संघांचा समावेश आहे. प्रत्येक संघासाठी स्वतंत्र मार्गदर्शक आणि प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. एमकेएम डिफेंडर्स संघाचे मार्गदर्शक शैलेंद्र ढोले, मुख्य प्रशिक्षक मनोज गोटेकर, तर सहायक प्रशिक्षक वंश शेंडे असतील. स्विफ्ट पँथर्स संघाचे मार्गदर्शक सुधीर चिटपीस असून, प्रेम रोखडे मुख्य प्रशिक्षक आणि चेतन दोनाडकर सहायक प्रशिक्षक असतील. राजमुद्रा वॉरियर्स संघाचे मार्गदर्शन सोनल रईच करणार असून, सौरभ कुमार दुबे मुख्य प्रशिक्षक आणि हिमांशू वाघाडे सहायक प्रशिक्षक असतील. ऑरेंजसिटी लायन्स संघासाठी निखिल गोटमारे मार्गदर्शक, प्रगती निंबार्ते मुख्य प्रशिक्षक आणि शंतनु धारगावे सहायक प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळतील. स्पोर्ट्स कर्मा संघाचे मार्गदर्शक अनिल बनकर असून, रोहित गंडाईत मुख्य प्रशिक्षक आणि यश वानखेडे सहायक प्रशिक्षक असतील. निर्मय घुरंधर संघाचे मार्गदर्शन राजेश्वर मोवाडे करणार असून, आकाश बालपांडे मुख्य प्रशिक्षक आणि पीयूष राठोड सहायक प्रशिक्षक म्हणून काम पाहतील.

ग्राहकांच्या गरजा समजून घ्या, व्यवसायात यशस्वी व्हा : संजय सावडे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



नवीन उत्पादन विकसित करणे म्हणजे केवळ बाजारात एखादे नवीन उत्पादन आणणे नव्हे, तर ग्राहकांच्या गरजा समजून घेणे, त्यांच्या समस्या सोडवणे आणि त्यातून मूल्यनिर्मिती करून यशस्वी व्यवसाय उभारणे होय, असे प्रतिपादन विठोबा हेल्थकेअर अँड रिसर्च प्रायव्हेट लिमिटेडचे कार्यकारी संचालक संजय सावडे यांनी केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनच्या वतीने चिटणवीस सेंटर येथे आयोजित साप्ताहिक सत्रात 'नवीन उत्पादन विकास : आव्हाने, अनुभव आणि शिकवण' या विषयावर ते बोलत होते. अनुप वानखेडे यांनी सत्राचे सूत्रसंचालन केले.

आजच्या स्पर्धात्मक व्यावसायिक वातावरणात सातत्याने नावीन्यपूर्ण बदल स्वीकारणाऱ्या कंपन्याच प्रगती करतात, असे सावडे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी ॲप्स, इलेक्ट्रिक वाहने, अन्नप्रक्रिया आणि बांधकाम क्षेत्रातील उदाहरणांद्वारे नवीन उत्पादन विकासाचे महत्त्व स्पष्ट केले. उत्पादन विकासाच्या प्रक्रियेत ग्राहकांच्या गरजांचा अभ्यास, कल्पनानिर्मिती, उत्पादनाची निर्मिती, गुणवत्ता व सुरक्षिततेची चाचणी, जाहिरात आणि बाजारपेठेत उत्पादनाचे सादरीकरण या टप्प्यांना महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी व्यावसायिक आणि तांत्रिक आव्हानांवरही त्यांनी प्रकाश टाकला. प्रारंभी ब्रिज सारडा यांनी 'मंथन ओटीपी' अंतर्गत कार्यालयात वारंवार उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्येवर आणि कार्यालयीन शिस्तीवर मार्गदर्शन केले.

सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळालीच नाही

शासनाच्या घोषणेनंतरही शेतकरी मदतीपासून वंचित; शेतकऱ्यांमध्ये नाराजी, धान खरेदीची मर्यादा वाढविण्यासह उन्हाळी धान पिकाच्या लागवडीला परवानगी देण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

राज्य शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याच्या उद्देशाने जाहीर केलेल्या ५ हजार रुपयांच्या आगाऊ आर्थिक मदतीचा लाभ सालेकसा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही. शासनाच्या घोषणेनंतर शेतकऱ्यांमध्ये आर्थिक मदत मिळण्याची आशा निर्माण झाली होती. मात्र, मदतीची रक्कम अद्याप बँक खात्यात जमा न झाल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत असून आर्थिक संकट अधिकच गडद झाले आहे. यंदा अवकाळी पाऊस आणि प्रतिकूल हवामानामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आधीच पीक उत्पादनावर परिणाम झाल्याने शेतकरी अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदतही न मिळाल्याने शेतकऱ्यांचा अपेक्षांवर पाणी फिरले आहे.

धान खरेदीची मर्यादा वाढविण्याची मागणी

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सध्या धान खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेल्या मर्यादेमुळे त्यांना आपले संपूर्ण धान विक्री करता येत नाही. त्यामुळे धान खरेदीची मर्यादा वाढविण्यात यावी, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळू शकेल. वासोबतच उन्हाळी धान पिकाच्या लागवडीस परवानगी देण्याची मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे. शेतीचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतकऱ्यांना अतिरिक्त पीक घेण्याची संधी मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

पात्र शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्या!

शासन व प्रशासनाने ५ हजार रुपयांच्या जाहीर केलेल्या आगाऊ आर्थिक मदतीसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांची सद्यस्थिती स्पष्ट करावी आणि मदतीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच धान खरेदीची मर्यादा वाढवून उन्हाळी धान पिकाच्या लागवडीस परवानगी देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. आता शासन व प्रशासन शेतकऱ्यांच्या या मागण्यांवर किती लवकर ठोस पावले उचलते आणि सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा कधी मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आगीत गरीब कुटुंबाचा संसार राख, मदतीसाठी हात पुढे करण्याचे आवाहन

टेलरिंग कामगाराचे घर जळून मोठे नुकसान, शेतमजूर महिलेच्या संसारोपयोगी वस्तू खाक

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड
मनिष शिंगणे



शेतात मजुरी करण्यासाठी गेलेल्या कुटुंबाच्या घराला अचानक आग लागून संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी दुपारी २.३० सुमारास अभ्यंकर चौक परिसरातील नगर परिषद जगनाडे प्राथमिक शाळेच्या मागील भागात घडली. या आगीत घरातील कपडे, धान्य, भांडी, घरगुती साहित्य, रोख रक्कम व इतर संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या. सुदैवाने घटनेच्या वेळी घरात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली.

प्रकाश गजभिये वय ५४ हे टेलरिंगचे शिवणकाम करतात, तर त्यांच्या पत्नी रंजुषा गजभिये वय ५० शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. नेहमीप्रमाणे रंजुषा सकाळी ६ च्या सुमारास शेतात मजुरीसाठी गेल्या होत्या. प्रकाश हे सकाळी नऊ वाजता लालबहादूर शास्त्री चौकातील दुकानात शिवणकामासाठी गेले होते. त्यानंतर ते तहसील कार्यालयाजवळील जुना ठेला दुरुस्तीच्या कामासाठी मुलगा दिपराजसोबत गेले होते. दरम्यान, घराजवळ बांधकाम करणारे मजूर निलकंठ कुंभारे व अनिकेत सोनटक्के यांच्या निदर्शनास घरातून धूर व आग येत असल्याचे आले. त्यांनी तत्काळ गजभिये कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली.

सामाजिक कार्यकर्ते सुरेश गजभिये यांनी नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधून अग्निशमन दलाला घटनास्थळी पाचारण केले. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली; मात्र तोपर्यंत घरातील बहुतांश साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. गजभिये दाम्पत्यास दोन मुले आहेत. दिपराज नुकताच सुट्टीसाठी बुटीबोरीहून घरी आला होता. तर मोठा मुलगा रोशन गजभिये वय २५ हा बी.टेक.चे शिक्षण घेत असून सध्या बुटीबोरी येथे परीक्षेसाठी आहे. परीक्षेच्या काळात मानसिक त्रास होऊ नये म्हणून घर जळाल्याची माहिती त्याला अद्याप देण्यात आलेली नसल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

घरातील सर्व साहित्य जळून गेल्याने गजभिये कुटुंबीयांकडे अंगावरील कपड्यांशिवाय काहीही शिल्लक राहिलेले नाही. कपडे, धान्य, भांडी, घरगुती साहित्य यासह काही रोख रक्कमही आगीत जळून नष्ट झाली. त्यामुळे या कुटुंबासमोर आता निवारा आणि दैनंदिन गरजांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, तहसील कार्यालयाच्या माध्यमातूनही नुकसानीची पाहणी करण्यात आली. तहसीलदार प्रेमकुमार आडे यांनी घटनेची नोंद घेतली असून, शासकीय नियमानुसार नुकसानग्रस्त कुटुंबाला शक्य तितक्या लवकर मदत मिळवून देण्यासाठी कार्यवाही केली जाईल, अशी माहिती देण्यात आली. दरम्यान, प्रभागाच्या नगरसेविका कल्पाणी गजभिये व जितेंद्र रेवतकर यांनी शासनाने या गरीब कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत तसेच निवाऱ्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

DEEPRAJ PRAKASH GAJBHIYE

प्रकाश गजभिये यांना आर्थिक सहकार्य करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करू शकता.

राख झालेला संसार पाहून कुटुंबीयांच्या डोळ्यांत अश्रू

शेतातील मजुरी आटोपून घरी परतलेल्या रंजुषा गजभिये यांना आपले घर पूर्णपणे जळून राख झाल्याचे समजताच त्यांच्या दुःखाला पारावार उरला नाही. पती प्रकाश व मुलगा दिपराज यांचे अश्रू अनावर झाले. हा प्रसंग पाहून उपस्थितांनाही गहिवरून आले. या कठीण प्रसंगी आमदार संजय मेश्राम यांनी गजभिये कुटुंबाला आर्थिक सहकार्य केले आहे. मात्र, संपूर्ण संसार आगीत उद्ध्वस्त झाल्याने कुटुंबाला मोठ्या मदतीची गरज आहे. सामाजिक बांधिलकीतून नागरिकांनी या कुटुंबासाठी कपडे, भांडी, धान्य, घरगुती वापराचे साहित्य तसेच आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी सदैव खंबीर साथ देणार : आ. सुधीर मुनगंटीवार

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांडरे



भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आणि जनजातीय गौरव दिनानिमित्त चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित कार्यक्रमात आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी आदिवासी बांधवांच्या पारंपरिक नृत्यात सहभागी होत त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी सदैव खंबीरपणे साथ देण्याची ग्वाही दिली.

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महापौर संगीता खांडेकर, भगवान बिरसा मुंडा स्मारक समितीचे अध्यक्ष अशोक तुमराम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आ. मुनगंटीवार म्हणाले की, भगवान बिरसा मुंडा यांनी अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात जल, जंगल आणि जमिनीच्या हक्कांसाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध ऐतिहासिक संघर्ष केला.

त्यांचे विचार आजही आदिवासी समाजाला प्रेरणा देणारे आहेत. चंद्रपूरमध्ये त्यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या संकल्पात सहभागी होता आले, हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी मंत्रीपदाच्या कार्यकाळात शबरी घरकुल योजनेचा शहरी भागात विस्तार, पेसा ग्रामपंचायतींना ५ टक्के थेट निधी, तेंदूपत्ता संकलकांना ७२ कोटींचा बोनस आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत असे महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

मिशन शौर्यच्या माध्यमातून आदिवासी युवकांनी एव्हरेस्ट सर केले असून, आता मिशन ऑलिम्पिक २०३६ अंतर्गत चंद्रपूरच्या आदिवासी खेळाडूने ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकावे, हे आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आदिवासी समाजाची प्रगती, विकास आणि सन्मान यासाठी कार्य करणे हे आपले कर्तव्य असून, समाजाच्या प्रत्येक सुख-दुःखात आणि अडचणीच्या काळात आपण खंबीरपणे पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

सोहम पंजाबराव खांडारे याला एमपीडीए कायद्याअंतर्गत अटक

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर



तालुक्यातील पोलीस स्टेशन केळवद, रेकॉर्डवर असलेल्या आरोपीचे नाव सोहम पंजाबराव खंडारे, वय २० वर्षे, रा. पंचशील नगर (इसासानी), ता. हिंगणा, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी., नागपूर शहर, जि. नागपूर, पोलीस स्टेशन केळवद, नागपूर ग्रामीण अंतर्गत. त्याच्यावर जीवित आणि मालमत्तेविरुद्ध गुन्हे दाखल आहेत (सदकाऱ्यांसह जीवे मारण्याचा प्रयत्न, दरोड्याचा प्रयत्न, प्राणघातक शस्त्राने गंभीर दुखापत करणे, सार्वजनिक ठिकाणी अश्लील कृत्य करणे, साथीदारांसह घरात प्रवेश करणे, विश्वासघातकी कृत्य करणे, बेशिस्त जमाव जमवणे, तोडफोड करून नुकसान करणे आणि अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणे इत्यादी). आरोपीविरुद्ध नोंदवलेले गुन्हे गंभीर स्वरूपाचे आहेत.

पोलिसांनी वेळोवेळी आरोपीविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजनाही केल्या आहेत. आरोपीची कृत्ये सामाजिक सुव्यवस्थेस अडथळा ठरत असल्याने आणि आरोपी समाजासाठी धोकादायक असल्याने, माननीय श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री. अनिल म्हस्के, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, यांच्या मार्गदर्शनाखाली केलावड पोलीस संकडुन एमपीडीए कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. जिल्हाधिकारी, जि. नागपूरः गुन्हेगार सोहम पंजाबराव खंडारे, वय २० वर्षे, राज. पंचशील नगर, (इसासानी), ता. हिंगणा, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी., नागपूर शहर, जि. असुन, केलावड पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यांतर्गत अटक करण्यासाठी आदेश जारी केला आहे.

जनजातीय गौरव दिन उत्साहात, क्रांतिकारकांच्या स्मृतिस्थळांवर दीपोत्सव

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१व्या जयंतीनिमित्त ह्याजनजातीय गौरव दिन' साजरा करण्यात आला. आदिवासी क्रांतिकारकांच्या शौर्य, संघर्ष आणि ऐतिहासिक योगदानाचे स्मरण करण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून विशेष दीपोत्सव उपक्रम राबवण्यात आला. यादरम्यान आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमा व पुतळ्यांची स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुशोभित करण्यात आला. आकर्षक विद्युत रोषणाई व दीपप्रज्वलन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. फुटाळा परिसरातील क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा, गोंड राजे बख्त बुलंद शाह, वीरांगना राणी दुर्गावती तसेच नारायणसिंह उईके यांच्या पुतळ्यांचा परिसर व कमल चौकात हा उपक्रम राबविण्यात आला. जल,जंगल,जमीन, समाजाचा स्वाभिमान व हक्कांच्या रक्षणासाठी दिलेला लढा नव्या पिढीपर्यंत पोहोचावा आणि क्रांतिकारकांच्या स्मृतिस्थळांचे संवर्धन व्हावे, हा यामागील मुख्य उद्देश आहे. हा सप्ताह केवळ सांस्कृतिक उत्सवापुरता मर्यादित न ठेवता, आदिवासी बांधवांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

आजनी येथे भागवत हरिनाम सप्ताह सुरू

दै. सिंहवाणी वृत्त, कामठी



कामठी तालुक्यातील आजनी येथे रविवार दिनांक १५ नोव्हेंबर ते रविवार २२ नोव्हेंबर पर्यंत गावातील हनुमान मंदिर व श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान परिसरात वारकरी संप्रदायाच्या आणि गावकऱ्यांच्या पुढाकाराने आयोजित भव्य भागवत हरिनाम सप्ताहाचे उद्घाटन रविवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी नरेंद्र महाराज लोहकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी सौंसर येथील प्रसिद्ध कथाकार ह भ प श्री विलास महाराज बनाईत यांच्या हस्ते करण्यात आले.

या सप्ताहात ह भ प कुमारी आचल गायकवाड, सावनेर, ह भ प श्री सुरेश महाराज बाकडे, उमरखेड, बालकीर्तनकार ह भ प रुद्र महाराज कदम, उमरखेड, ह भ प श्री श्याम महाराज बडवाईक, मध्यप्रदेश, ह भ प श्री सुबोध महाराज महल्ले, नागपूर, ह भ प श्री पुरुषोत्तम महाराज इंगोले, उमरखेड, ह भ प श्री जयेश महाराज भाग्यवंत, मुंबई इत्यादी कीर्तनकार कीर्तन सेवा देणार असून या सप्ताहाच्या आयोजनाकरिता आळंदी ते पंढरपूर पायी वारी आपदा चॅरिटेबल ट्रस्ट यांचे फार मोठे योगदान आहे.

गावातील आणि बाहेरील मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केलेले आहे. काही दान दात्यांच्या वतीने सप्ताहा दरम्यान अल्पोहार तसेच प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विविध वेशभूषा आणि देखाव्याचे प्रदर्शन सुद्धा करण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वीर बजरंग क्रीडा मंडळ, नवयुवक युवा मंडळ, रेणुका क्रीडा मंडळ, बालगणेश उत्सव मंडळ तसेच जय बजरंग क्रीडा मंडळ, माँ शारदा उत्सव मंडळाचे कार्यकर्ते आणि बळवंतराव नेऊलकर विशेष सहकार्य करत आहेत.

या सप्ताहाच्या उद्घाटन सोहळ्यात देवराव्जी रडके (माजी आमदार), पोलिस पाटील बळवंतराव रडके, भगवंतराव रडके, माजी सभापती उमेश भाऊ रडके, बेनिरामजी विघे, ह भ प बंडूजी महाराज महल्ले, सरपंच हेमराज दवंडे, प्रभाकर देशमुख, श्रीकांत गिऱ्हे, तुकाराम लायबर, मोतीराम विघे, मोतीराम इंगोले, रामेश्वर इंगोले, खुशाल विघे, वीरेंद्र पाली, ईशान ठाकूर, नंदकिशोर वानखेडे, सदानंद देवसरकर, एकनाथजी महल्ले, नितीन रडके, तुषार रडके, बंडूजी भोयर, विजय वांढरे, नरेश वाट, केशवजी गरमडे, प्रभाकर लाडस्कर, बाबुराव धंदरे, विनोद वाट, दिनेश बडगे, नरेश जीवतोडे, सुरेंद्र रामटेके, प्रवीण येलेकर, जितेंद्र पाली, कवडू चिंचुलकर, दिवाकर घोडे, लीलाधर वाणी, शेषराव चौके, सागर चिखलकर, नामदेव दवंडे, प्रशांत घोडे, रामदास भोयर, नारायण पारेकर, भैय्यालाल चमेले, गणपत झलके, विनोद भोयर, दिवाकर नागोसे, अशोक चव्हाळे, मनोहर हेटे, गजानन विघे, निलित वानखेडे, कुणाल इंगोले, लीलाधर दवंडे, मेघा वाट, माधुरी पाली, दुर्गा भोयर, वेणूबाई भोयर, मनिषा रडके, करुणा रडके, सरोज पाली, भारती वांढरे, स्वाती महल्ले, उत्तम धंदरे, गुणवंत राऊत, वारकरी संप्रदायाचे सर्व सेवेकरी, गावातील विविध भजन मंडळी, ग्राम पंचायत पदाधिकारी आणि कर्मचारी, अन्नदान कर्ता, महिला भजन मंडळी, भागवत सप्ताह कमेटीचे सदस्य आणि गावातील विविध मान्यवर व्यक्ती आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. रविवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी पालखी सोहळा आणि गोपाळ काल्याच्या कीर्तनासह या सप्ताहाचे समापन होणार आहे. याच दिवशी दुपार नंतर महाप्रसादाच्या आयोजन करण्यात येणार आहे.

गावात आयोजित या भागवत सप्ताहामुळे गावात अध्यात्माचे व आनंदाचे एक वातावरण निर्माण झाल्यासारखे झाले आहे.

थोडक्यात

आयएमए सावनेर शाखेचे मानकरी डॉ. प्रवीण चव्हाण यांना 'उत्कृष्ट मानद सचिव' पुरस्कार प्रदान



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

इंडियन मेडिकल असोसिएशन सावनेर शाखेचे मानद सचिव डॉ. प्रवीण चव्हाण यांना सन २०२५-२६ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातील लहान शाखांच्या गटातून 'Best Hon. Secretary – Small Branch' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य आयएमएचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आयएमएचे राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. विजय धोटे सर, आयएमए सावनेर शाखेच्या विद्यमान अध्यक्षा डॉ. स्मिता भुडे मॅडम तसेच ज्येष्ठ आयएमए सदस्य डॉ. विजय घाटे उपस्थित होते. डॉ. प्रवीण चव्हाण यांनी आपल्या सचिवपदाच्या कार्यकाळात आयएमए सावनेर शाखेच्या विविध सामाजिक, वैद्यकीय व संघटनात्मक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. शाखेच्या कार्याचा विस्तार, सदस्यांचा सक्रिय सहभाग आणि वैद्यकीय जनजागृतीच्या विविध उपक्रमांमधील योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे आयएमए सावनेर शाखेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण सावनेर वैद्यकीय क्षेत्रातून डॉ. प्रवीण चव्हाण यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार म्हणजे केवळ वैयक्तिक सन्मान नसून आयएमए सावनेर शाखेच्या सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सहकाऱ्यांच्या सामूहिक कार्याचा गौरव आहे.

देशगौरव प्रतिष्ठानच्यावतीने दिवाळी निमित्त बेसा-पिपळा येथे शिधा वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

देशगौरव प्रतिष्ठानच्यावतीने दिपावलीच्या अनुषंगाने सेवा वस्ती मध्ये शिधा वाटप कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमाचा उद्देश गोरगरीबांची दिवाळी आनंदाची व मंगलमय होवो या संकल्पनेतून नरेश भोयर अध्यक्ष देशगौरव प्रतिष्ठान व उपनगराध्यक्ष बेसा पिपळा नगरपंचायत यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या प्रसंगी अनिलजी पेठे, निखिल भोयर, पंकज वैद्य, निलेश चिंचुळकर, तुषार भोयर, रंजित भोयर,भोंडवेजी, खुशालजी बोपटे, प्रकाश जामठे, चारुदत्त मोडक, अमोल धनुष्कर पंत उपाध्यक्ष आदींनी परिश्रम घेतले.

श्री मंगल ग्रामीण सहकारी पतसंस्थेत सहकार सप्ताह व दिवाळी स्नेहमेळावा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

श्री मंगल ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित, खापरखेडा येथे सहकार सप्ताह व दिवाळी स्नेहमेळाव्याचे आयोजन उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, कर्मचारीवृंद तसेच अभिकतावृंद मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चंदूजी पाटील होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये रवीजी वर्मा, डॉ. प्रमोदजी सातगे, गंगाधरजी खोंडे, राजेंद्रजी साबळे, दशरथजी लांडे, चंद्रशेखर लांडे, दिलीपजी मेश्राम, प्रणयजी कोरडे आणि केशवजी आमदरे यांची उपस्थिती लाभली.

सहकार सप्ताहाच्या निमित्ताने सहकार चळवळीचे महत्त्व, ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासातील सहकारी संस्थांचे योगदान तसेच सभासदांच्या आर्थिक उन्नतीमध्ये पतसंस्थेची भूमिका यावर या स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला. सहकाराच्या तत्त्वांवर आधारित विश्वास, पारदर्शकता, एकजूट आणि परस्पर सहकार्य यांच्या बळावर संस्थेची प्रगती अधिक वेगाने साधता येते, असा संदेश यावेळी देण्यात आला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहमेळाव्यामुळे संस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी आणि अभिकर्ते यांना एकत्र येण्याची व परस्परांशी स्नेहपूर्ण संवाद साधण्याची संधी मिळाली. संस्थेच्या वाटचालीत प्रत्येक घटकाचे योगदान महत्त्वाचे असून, सर्वांच्या एकजुटीने आणि सामूहिक प्रयत्नांनी संस्थेचा नावलौकिक अधिक उंचावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेचे सर्व संचालक मंडळ, कर्मचारीवृंद आणि अभिकतावृंद यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. आनंद, उत्साह, आपुलकी आणि सहकार्याच्या वातावरणात हा स्नेहमेळावा पार पडला.सहकारातून समृद्धी, एकजुटीतून प्रगती आणि विश्वासातून विकास हा विचार अधोरेखित करणारा श्री मंगल ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित, खापरखेडा यांचा सहकार सप्ताह व दिवाळी स्नेहमेळावा सर्वांच्या सहभागामुळे संस्मरणीय ठरला.

उदयसिंह खंडाते यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



उदयसिंह खंडाते (वय ५५ वर्षे)उपअभियंता महानगरपालिका नागपूर यांचे आज हृदय विकाराने निधन झालेले आहे. अंत्यविधी सोमवारी सकाळी १० वाजता गंगाबाई घाट येथे पार पडण्यात येईल.

रस्ता कुठे आहे? मृत्यूच्या सापळ्यात सामाजिक कार्यकर्त्यांचे 'शयन' आंदोलन!

वरोरा तालुक्यातील उखर्डा-शेगाव-नागरी-माढेळी रस्त्याची चाळण, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात अभिजित कुडे यांचा अनोखा संताप

दै. सिंहवाणी वृत्त, धर्मेंद्र शेरकुरे- वरोरा

"रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता?" असा प्रश्न पडावा, इतकी भयानक आणि दयनीय अवस्था वरोरा तालुक्यातील उखर्डा ते उखर्डा पाटी आणि शेगाव ते शेगाव पाटी-नागरी-माढेळी या मुख्य मागर्ची झाली आहे. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे या रस्त्याचा अक्षरशः मरणयातना देणारा प्रवास सुरू आहे. अखेर गेंड्याच्या कातडीच्या प्रशासनाला आणि झोपलेल्या लोकप्रतिनिधींना जागे करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे यांनी चक्क रस्त्यावरील भल्यामोठ्या खड्ड्यात झोपून आणि बसून आपला तीव्र निषेध नोंदवला.



लोकप्रतिनिधी आणि बांधकाम विभाग कुंभकर्णी झोपेत!

गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिक नरकयातना भोगत आहेत. स्थानिक आमदार करण देवतळे आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांचे या गंभीर प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संतप्त नागरिकांकडून केला जात आहे. दुसरीकडे, सार्वजनिक बांधकाम विभाग जणू काही कुंभकर्णी झोपेत गेल्याचे चित्र आहे. या जीवघेण्या रस्त्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात घडत असून, सर्वसामान्य नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे.

आंदोलने करूनही प्रशासन ढिम्म!

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी यापूर्वीही या रस्त्यावर अनेक अभिनव आंदोलने करण्यात आली. पावसाळ्यात जेव्हा या खड्ड्यांना तलावाचे स्वरूप येते, तेव्हा खड्ड्यात स्विमिंग (पोहणे) करून, तर कधी दिवे लावून, भजन करून आणि चक्क रस्त्यात झाडे लावून निषेध व्यक्त करण्यात आला. अनेक निवेदने देऊनही प्रशासनाने केवळ झोपेचे सोंग घेतले आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांना सर्वसामान्यांच्या जीवाची कवडीमोलही पर्वा उरलेली नाही, असा संतप्त सूर परिसरात उमटत आहे.

ओव्हरलोड ट्रक आणि धुळीच्या साम्राज्याने नागरिक त्रस्त

या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड ट्रकची अवैध वाहतूक सुरू असते, ज्यामुळे उरल्यासुरल्या रस्त्याचीही पूर्णपणे चाळण झाली आहे. डांबर गायब होऊन केवळ मोठमोठे टोकदार दगड उघडे पडले आहेत. दिवसाढवळ्या उडणाऱ्या धुळीच्या साम्राज्यामुळे दुचाकीस्वारांना समोरचे काहीच दिसत नाही, तर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रमुख समस्या आणि परिणाम:

विद्यार्थी व रुग्णांचे हालः शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे दैनंदिन वेळापत्रक कोलमडले असून, गर्भवती महिला आणि अत्यवस्थ रुग्णांना रुग्णालयात नेताना जीवावर बेतणारा प्रवास करावा लागत आहे. शेतकऱ्यांचे नुकसानः शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, वाहनांचे वारंवार नुकसान होत आहे.

अर्थव्यवस्थेला फटकाः खराब रस्त्यामुळे या भागातील दळणवळण आणि व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर आहे.

"प्रशासन जागे झाले नाही, तर तीव्र जनआंदोलन छेडू!"

"गेल्या ६ वर्षांपासून आम्ही केवळ आश्वासनांचे गाजर खात आहोत. माणसाने जगावे की मरावे? लोकप्रतिनिधी आणि बांधकाम विभागाने तात्काळ या रस्त्याचे काम सुरू करावे, अन्यथा आगामी काळात संपूर्ण तालुक्यातील नागरिकांना सोबत घेऊन प्रशासनाच्या विरोधात तीव्र जनआंदोलन उभारले जाईल," असा थेट इशारा सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे यांनी दिला आहे.

युवा शक्ती विकास मंचचे भव्य छठ पूजा सोहळ्याचे आयोजन

समाजसेवी तसेच कामगार संघटनांनी छठ पूजा साजरी करण्यासाठी सामूहिक प्रयत्न केले, श्रद्धेला राजकीय व्यासपीठ बनवू नका : श्याम चव्हाण, उत्तर प्रदेशातील गोरखपूरचे गायक आकर्षणाचे केंद्र ठरले

दै.सिंहवाणी वृत्त, सावनेर

उत्तर भारतीयांचा पवित्र सण, "छठ पूजा," १५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता सुरू झाला, जिथे मावळत्या सूर्यदेवाची पूजा करण्यात आली. याप्रसंगी, स्थानिक आमदार आणि माजी मंत्री सुनील केदार, सावनेर पंचायत समितीचे माजी उपाध्यक्ष प्रकाश परते, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष किशोर धुंडेले, वेकोली सावनेर परिसरात कार्यरत असलेल्या सर्व कामगार संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य, तसेच प्रमुख मान्यवर उपस्थित होते.



उत्तर भारतीयांचा पवित्र सण असलेल्या छठ पूजेचा पहिला सोहळा पार पडला. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४:०० वाजता सूर्यास्ताला सुरुवात झाली तर दुसरा उत्सव, उगवत्या सूर्याची पूजा, १६ नोव्हेंबर रोजी पहाटे ४:०० ते सकाळी ९:०० या वेळेत आयोजित केला जाईल. भगवान सूर्याची पूजा करण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी उत्तर भारतीयांसह हजारो स्थानिक लोक आपल्या कुटुंबासह वेकोली येथील सावनेर प्रकल्पात दाखल झाले. छठ पूजेच्या उत्सवादरम्यान माजी आमदार आणि माजी मंत्र्यांच्या उपस्थितीने आयोजकांमध्ये उत्साह संचारला. माजी आमदार सुनील केदार यांनीही प्रत्येक देवघराला भेट देऊन भगवान सूर्यदेवाची प्रार्थना केली आणि सर्व कुटुंबांना शुभेच्छा दिल्या.

दरवर्षीप्रमाणे, वेकोली छठ घाट समिती, सर्व युवा संघटना आणि वेकोलीमध्ये काम करणारे सर्व कार्यकर्ते हा भव्य उत्सव यशस्वी करण्यासाठी कार्यरत आहेत. १५ नोव्हेंबर रोजी सूर्यास्ताच्या वेळी आणि १६ नोव्हेंबर रोजी सूर्योदयाच्या वेळी झालेल्या छठ पूजेच्या उत्सवात संघटनांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि उत्सवाचा आनंद घेण्यासाठी छठ पूजा घाटावर पोहोचले.

या प्रसंगी, युवा शक्ती विकास मंचाचे अध्यक्ष श्याम चव्हाण यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावात म्हटले की, युवा शक्ती विकास मंच मागील अनेक वर्षांपासून छठ पूजेचे आयोजन करत आहे आणि भविष्यातही ते सुरू ठेवेल. काही लोक श्रद्धेच्या या सणाचे राजकारण करण्याचा अयशस्वी प्रयत्न करत आहेत. मी छठी मातेला प्रार्थना करतो की, जे समाज आणि श्रद्धेला विषारी बनवतात त्यांना बुद्धी दे, जेणेकरून ते अशा क्षुद्र राजकारणात गुंतणार नाहीत आणि या क्षेत्रात बंधुभाव टिकून राहील.

या भव्य कार्यक्रमात, उत्तर प्रदेशातील गोरखपूरचे चित्रपट अभिनेते सर्वेश तिवारी, आजमगडच्या गायिका राणी प्रजापती, मध्य प्रदेशातील भोपाळच्या गायिका दुर्गा पटेल आणि मध्य प्रदेशातील जबलपूरच्या गायिका शालिनी चव्हाण यांनी आपल्या सुमधुर आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

या दिमाखदार कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवाशक्ती विकास मंचचे अध्यक्ष श्याम चव्हाण, वेकोली कामगार संघटनेचे महेश पटवा, अशोक निंबाळकर, भालचंद्र गाझीपुरी, गुणवंत लांजेवार, मुकेश झरबडे, राज पाटील, नीलेश धुर्वे, सुनील केशर, सुमन म्हारस्कोळे, दीपेंद्र चंदवाडे, श्रीकृष्ण चंदवाडे, युवाशक्ती विकास मंच, अशोक चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कश्यप, संजय गौतम, राजू रविदास, सोनू सरोज, रविराज, इंगोले, सुफी मुकदर भाई, राजेश जैस्वाल, विश्वभर तिवारी, राजेश चव्हाण, विकास त्रिपाठी, अनिल वाघ, दामू कराळे, नरेश नागलकर, प्रभुदास पाली, आदींनी परिश्रम घेतले. तर साहेबराव महल्ले यांनी कार्यक्रमाचे यशस्वी संचालन केले.

बालक दिनानिमित्त त्रिशताब्दी गार्डन, नंदनवन नागपूर येथे भव्य चित्रकला स्पर्धा संपन्न





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिनांक १४ नोव्हेंबरला सकाळी ८ ते ९ वाजता त्रिशताब्दी गार्डन, आदिशक्ती दुर्गा मंदिराजवळ, नंदनवन नागपूर येथे बालक दिनाच्या औचित्य साधून जवाहर बाल मंच व नागपूर जिल्हा कलाध्यापक संघर्षाच्या संयुक्त विद्यमाने आणि शामबाबू वाघ यांच्या सौजन्याने निःशुल्क चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत गट 'अ' - वर्ग १ ते ४ ,गट 'ब' - वर्ग ५ ते ८,गट 'क' - वर्ग ९ ते १२ व मतीमंद विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला या स्पर्धेत एकंदरीत १५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्या कलेचे प्रदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार रमेश लांजेवार यांनी केले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी आमदार दिनानाथ पडोळे, माजी नगरसेवक प्रशांत धवड, योगगुरू सुरेश शर्मा,आयोजक श्यामबाबू वाघ व किरण राऊळवार,नरेंद्र बारई,राजेश गवरे,शेखर वानस्कर,संजय पळसकर यांनी याप्रसंगी आपले विचार मांडले.

त्याचप्रमाणे कार्यक्रमाला सुशोभित करण्यासाठी नंदकिशोर चौधरी,मनीषा मोगलेवार, विनोद तवले,कुंदा कुंभारे,रूपाली माध्येस्वार,गोपाल घोटे, चंद्रकांत देवगिरीकर,विवेक कोर, कलई श्रीकांत शास्त्रकार, एडवोकेट बडे,एकनाथजी टापरे,लक्ष्मणराव गोमासे, डॉक्टर भगवान ठाकर,ताराचंद शेंडे,बाळसाहेब काथोटे, निलेश कावळे, जिवन डवले, खोब्रागडे काका, सतिश चरडे, चाफले गुरूजी, नंदकिशोर घोंगे, राजु वाघ, राजु शेंडे, विकास होरे, अशोक खडसे,बाबाराव त्यापरी, प्रकाश निमजे, अशोक जिचकार, अनिल पुंजे, सुरेश वनवे इत्यादीसह संपूर्ण पालकवर्ग यांनी सहकार्य करून विद्यार्थ्यांनमध्ये कलेच्या माध्यमातून नवीन उर्जा निर्माण करण्याचे काम केले व स्पर्धा थाटात संपन्न झाली.

कालव्यांच्या दुरवस्थेमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली

झाडाझुडपांनी व्यापलेले कालवे, ठिकठिकाणी भेगा आणि खड्डे; सिंचनाचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्यात अडथळे, कालव्यांची दुरुस्ती व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

सालेकसा तालुक्यातील कोटरा येथील बाघ-इटियाडोह सिंचन प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या धरण आणि कालव्यांच्या देखभालीचा प्रश्न आता शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील शेतकऱ्यांना शेतीच्या सिंचनासाठी कालव्यांद्वारे पाणी उपलब्ध करून दिले जाते. यासाठी दोन्ही राज्यांच्या सरकारांकडून कालव्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. मात्र, योग्य देखभाल व दुरुस्तीअभावी कालव्यांची



स्थिती दिवसेंदिवस खराब होत चालली आहे.

सध्या कालव्यांच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात झाडाझुडपे वाढली आहेत. तसेच अनेक ठिकाणी कालव्यांना भेगा पडल्या असून खड्डेही निर्माण झाले आहेत. त्यामुळे कालव्यांमधून सोडण्यात येणारे सिंचनाचे पाणी ठिकठिकाणी गळती होऊन वाया जात आहे. याचा थेट परिणाम शेतांपर्यंत पाणी पोहोचण्याच्या व्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे. विशेषतः कालव्यांच्या शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कालव्यांची नियमित स्वच्छता आणि दुरुस्ती होत नसल्यामुळे सिंचन व्यवस्था प्रभावित होत आहे. कालव्यांच्या देखभालीसाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांची कमतरताही या समस्येचे एक प्रमुख कारण मानले जात आहे. वेळेत कालव्यांची स्वच्छता, भेगांची दुरुस्ती आणि खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले नाही, तर आगामी काळात शेतकऱ्यांना सिंचनासाठी गंभीर अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

मध्यप्रदेश सरकारकडे कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची मागणी

शेतकरी व परिसरातील नागरिकांनी मध्यप्रदेश सरकारकडे कालव्यांच्या नियमित देखभालीसाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश सरकारच्या संबंधित सिंचन विभागांनी संयुक्तपणे कालव्यांची पाहणी करून झाडाझुडपांची साफसफाई, खराब झालेल्या भागांची दुरुस्ती आणि पाण्याची गळती रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, कोट्यवधी रुपयांच्या सिंचन प्रकल्पाचा प्रत्यक्ष लाभ तेव्हाच मिळू शकतो, जेव्हा कालव्यांची नियमित देखभाल केली जाईल आणि सिंचनाचे पाणी शेताच्या शेवटच्या टोकापर्यंत समान प्रमाणात पोहोचेल. त्यामुळे या गंभीर समस्येकडे दोन्ही राज्यांची सरकारे, संबंधित सिंचन विभागाचे अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून केली जात आहे.

थोडक्यात

भगवान बिरसा मुंडा जयंतीचा कार्यक्रम मनसर येथे उत्साहात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

आदिवासी समाजाचे महानायक, क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी मनसर येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी केलेला संघर्ष, सामाजिक कार्य, स्वाभिमान आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास मल्लिकार्जुनजी रेड्डी माजी आमदार कैलास नरले सरपंच मनसर सतीशजी डोंगरे मार्जी जि.प. सदस्य,ग्रा.पं सदस्य बैजू खरे, रेखाताई मडावी,अजय मडावी सरपंच पटगौरी, मोहनजी भगत, तंटामुक्ती अध्यक्ष, समाजसेविका सौ. सपना मडावी,आदिवासी नेते दिलीप वरखडे, संदीप मडावी, देवाभाऊ इडपाचे,कन्हैया पंधराम, अनिल रौतेल, मनीष खोब्रागडे, विलास मडावी, इशू वानखेडे, राजा कठोते,रामदास उईके,बंडू धुर्वे, राजकुमार धुर्वे, नथूजी उईके शंकर धुर्वे, बिरज उईके,फत्तुजी आत्राम, विष्णू छोरी, शामराव सलामे, विजय टेकाम,कौतिक परतेती,चंद्रकला उईके, लक्ष्मी मडावी, रोहित मडावी,सौरभ मडावी, अंकित धुर्वे,श्रीकांत उईके, आकाश कठोते,मदन कठोते, पंकज इनवते,दुर्गेश टेकाम,अंकिता मरसकोले, अनिता उईके, शारदा उईके, अनुसया धुर्वे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेना उमरेड शाखा सिर्सीच्या वतीने दिव्यांग बांधव व एकल विधवा महिलांना दिवाळी भेटीचे वाटप

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून 'आनंदाचा शिधा' किटचे वितरण; सामाजिक बांधिलकी जपत शिवसैनिकांचा स्तुत्य उपक्रम




दै. सिंहवाणी वृत्त, सिर्सी

दिवाळी सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून शिवसेना उमरेड शाखा सिर्सी यांच्या वतीने शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून सिर्सी गावातील दिव्यांग बांधव तसेच एकल विधवा महिलांना दिवाळीनिमित्त 'आनंदाचा शिधा' किटचे वाटप करण्यात आले. सिर्सी येथील श्री रंगनाथ बाबा देवस्थान परिसरात हा वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. दिवाळीच्या सणानिमित्त गरजू व वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून शिवसेनेने सामाजिक बांधिलकी जपत समाजातील गरजू घटकांप्रती आपली संवेदनशीलता व्यक्त केली. या कार्यक्रमाला शिवसेना उमरेड विधानसभा सचिव दिलीप सोनटक्के, उमरेड तालुका प्रमुख अभिषेक नानहें, सुनील चिंचुकलकर, उपतालुका प्रमुख अखिल रोडे, नारायण वरभे, प्रभाकर वाकडे, गजानन राणे यांच्यासह अनेक शिवसैनिक तसेच दिव्यांग बांधव उपस्थित होते. दिवाळीच्या निमित्ताने मिळालेल्या या भेटीमुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान पाहायला मिळाले. सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा शिवसेनेचा प्रयत्न या उपक्रमातून अधोरेखित झाला.

पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथे क्रांतीवीर बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

आदिवासी समाजाचे महानायक, थोर स्वातंत्र्यसेनानी आणि शहीद क्रांतीवीर भगवान बिरसा मुंडा यांची जयंती १५ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथे श्रद्धा व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वर्ष २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, संत व समाजसुधारक यांच्या जयंती शासकीय कार्यालयांमध्ये साजऱ्या करण्याबाबत निर्देश दिले आहेत. या शासन निदेशांच्या अनुषंगाने रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक योगीराज जाधव यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या महान कार्याचे स्मरण केले. भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अन्यायाविरुद्ध लढा देत ब्रिटिश सत्तेविरोधात क्रांतीची मशाल पेटवली होती.

सोन्याची मर्यादा नव्हे, स्रोत महत्त्वाचा ! सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट संदेश

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा

भारतीय संस्कृती आणि परंपरेमध्ये सोन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेषतः भारतीय महिलांसाठी सोने हे केवळ एक दागिन्यांपुरते मर्यादित नसून, ती एक सुरक्षित आर्थिक गुंतवणूक आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेला परंपरेचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. मात्र, घरात नक्की किती सोने बाळगता येते आणि त्या सोन्याचा हिशेब सरकारला किंवा प्रशासनाला कधी द्यावा लागतो, याविषयी सर्वसामान्यांच्या मनात अनेक गैरसमज आहेत.

एका ठराविक मर्यादेपर्यंत सोने घरात ठेवल्यास त्याच्या स्रोताची माहिती प्रशासनाला द्यावी लागत नाही, असा एक मोठा गैरसमज समाजात रूढ होता. याच समजाला आणि कायदेशीर तरतुदींचा चुकीच्या अर्थाला सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका ऐतिहासिक निकालाद्वारे स्पष्ट केले आहे. या महत्त्वपूर्ण निकालामुळे घरात सोने ठेवण्याची मुभा आणि त्या सोन्याचा कायदेशीर स्रोत यातील सीमारेषा अतिशय स्पष्ट झाली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (ज्याला पूर्वी सीबीडीटी म्हटले जायचे) नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. १ डिसेंबर २०१६ रोजी अर्थ मंत्रालयाने एका परिपत्रकाद्वारे आणि त्याआधी ११ मे १९९४ च्या जुन्या नियमांचा संदर्भ देत प्राप्तिकर विभागाच्या धाडीसंदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट केली होती. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जेव्हा प्राप्तिकर विभाग एखाद्या व्यक्तीच्या घरावर छापा टाकतो, तेव्हा तिथे सापडलेले ठराविक मर्यादेतील सोने जप्त केले जात नाही. भारतीय कुटुंबांमधील परंपरा लक्षात घेऊन ही सवलत देण्यात आली आहे.

या नियमानुसार, घरात जर विवाहित महिलेचे ५०० ग्रॅम, अविवाहित महिलेचे २५० ग्रॅम आणि पुरुषाचे (विवाहित किंवा अविवाहित) १०० ग्रॅम सोने असेल, तर प्राप्तिकर अधिकारी ते सोने सामान्यतः जप्त करत नाहीत. छापा पडलेल्या क्षणी कुटुंबाकडे त्या सोन्याच्या खरेदीच्या पावत्या नसल्या, तरीही या मर्यादेतील सोन्याला जप्तीपासून संरक्षण मिळते. या नियमाचा आधार घेत अनेकांनी असा सोयीस्कर अर्थ काढला होता की, या मर्यादेत सोने असेल तर त्याचा कोणताही हिशेब कायद्याला देण्याची गरजच नाही.

हाच गैरसमज दूर करणारा एक महत्त्वाचा खटला सर्वोच्च न्यायालयात सुनावणीला आला होता. हे प्रकरण 'फुलपरी कुमारी विरुद्ध बिहार राज्य' या खटल्याशी संबंधित आहे. फुलपरी कुमारी आणि त्यांचे पती (जे एक सरकारी कर्मचारी आहेत) यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत बेहिशोबी मालमत्ता जमवल्याचा अत्यंत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान १४ मे २०२६ रोजी पाटणा उच्च न्यायालयाने असा निकाल दिला होता की, संबंधित महिलेकडे सापडलेले सोने हे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने घालून दिलेल्या ५०० ग्रॅमच्या कायदेशीर मर्यादेत आहे. त्यामुळे या सोन्यावर कारवाई करता येणार नाही, असा निष्कर्ष काढत उच्च न्यायालयाने त्यांच्यावरील फौजदारी कारवाई रद्द केली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला बिहार राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आणि तिथूनच या कायद्याचा खरा अर्थ नव्याने प्रस्थापित झाला.

बिहार सरकारच्या याचिकेवर सुनावणी करताना, २ नोव्हेंबर २०२६ रोजी न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती अरुण पल्ली यांच्या खंडपीठाने पाटणा उच्च न्यायालयाचा आधीचा निर्णय पूर्णपणे रद्दबातल ठरवला. सर्वोच्च न्यायालयाने अतिशय स्पष्ट शब्दांत नमूद केले की, एखाद्या विवाहित महिलेकडे असलेले सोने ५०० ग्रॅमच्या कायदेशीर मर्यादेत असले तरीही, बेहिशोबी मालमत्तेच्या प्रकरणात आरोपीला त्या सोन्याचा कायदेशीर स्रोत सांगावाच लागेल. प्राप्तिकर विभागाच्या जप्तीपासून संरक्षण मिळणे याचा अर्थ बेहिशोबी संपत्तीच्या हिशेबातून कायमची मुक्ती मिळणे, असा अजिबात होत नाही. जर एखाद्या लोकसेवकावर किंवा व्यक्तीवर भ्रष्टाचाराचे आरोप असतील, तर ते ५०० ग्रॅम सोने कायदेशीर मार्गाने आणि वैध पैशातूनच खरेदी केले आहे, हे सिद्ध करणे त्यांच्यासाठी अनिवार्य आहे. "सोने ५०० ग्रॅमच्या मर्यादेत आहे, त्यामुळे मी त्याचा हिशोब देणार नाही" असा कोणताही बचाव भ्रष्टाचार किंवा बेहिशोबी मालमत्तेच्या खटल्यात न्यायालयात ग्राह्य धरला जाणार नाही, हे या निकालाने अधोरेखित केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या स्पष्टीकरणामुळे सर्वसामान्य कुटुंबांनी किंवा महिलांनी घाबरून जाण्याची कोणतीही गरज नाही. मुळातच, भारतात व्यक्तीने स्वतःच्या घरात किती सोने ठेवावे, यावर कोणतीही कमाल कायदेशीर मर्यादा नाही. जर तुमच्याकडे असलेले सोने हे कायदेशीर मार्गाने जसे की स्वतःची प्रामाणिक कमाई, शेतीचे उत्पन्न, लग्नातील भेटवस्तू किंवा वारसाहक्काने आलेले असेल आणि त्याचे पुरावे तुमच्याकडे असतील, तर तुम्ही कितीही सोने बाळगू शकता. सर्वोच्च न्यायालयाचा हा ताजा निकाल प्रामुख्याने भ्रष्टाचार करून काळा पैसा जमवणाऱ्या आणि भ्रष्ट मार्गाने बेहिशोबी मालमत्ता गोळा करणाऱ्या लोकांशी संबंधित आहे.

भविष्यातील कायदेशीर किंवा प्राप्तिकर विभागाच्या अडचणी टाळण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी आणि महिलांनी सोने बाळगताना काही महत्त्वाच्या सवयी अंगवळणी पाडणे आवश्यक आहे. सोने खरेदी करताना नेहमी पक्के बिल किंवा खरेदीची पावती घेणे आणि ती जपून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. रोखीने व्यवहार करण्यापेक्षा डिजिटल पेमेंट किंवा बँकेतून पैसे काढून सोने घेतल्यास, त्याच्या नोंदी बँक पासबुकमध्ये कायमस्वरूपी राहतात, ज्या भक्कम पुरावा म्हणून काम करतात. अनेक कुटुंबांमध्ये आजी, पणजी किंवा सासूकडून मिळालेले पारंपरिक दागिने असतात, अशा वेळी कुटुंबातील वाटणीचे पुरावे, मृत्युपत्र किंवा कौटुंबिक नोंदवही ठेवणे फायदेशीर ठरते. याशिवाय लग्नात मिळालेल्या सोन्याच्या दागिन्यांचे फोटो, जवळच्या नातेवाईकांनी दिलेल्या भेटींची यादी आणि शक्य असल्यास बक्षीसपत्र (गिफ्ट डीड) करून घेतल्यास ते भविष्यात कायदेशीर पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाते. थोडक्यात सांगायचे तर, विवाहित महिलांना ५०० ग्रॅमपर्यंत सोने घरात बाळगताना तात्पुरती मुभा नक्कीच मिळते, परंतु देशाच्या कायद्यानुसार बेहिशोबी संपत्ती बाळगणाऱ्यांना 'मर्यादित सोन्याचे' ढाल करून आता कायद्याच्या कचाट्यातून वाचता येणार नाही.

- ९५६१५९४३०६

कंधारमध्ये सातवे छत्रपती शिवाजी महाराज मराठी साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

दुष्काळावर मात करण्यासाठी शिवरायांचे कृषी व लोककल्याणकारी धोरण आजही मार्गदर्शक : डॉ.शरद गोरे



दै. सिंहवाणी वृत्त, कंधार (नांदेड)

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे आयोजित सातवे छत्रपती शिवाजी महाराज मराठी साहित्य संमेलन कंधार येथे उत्साहात पार पडले. सुप्रसिद्ध साहित्यिका आरती झोटिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनाचे निमंत्रक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे होते. यावेळी देशभरातील शंभरहून अधिक साहित्यिकांनी सहभाग घेतला. संमेलनात बोलताना डॉ. शरद गोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी, जलव्यवस्थापन आणि लोककल्याणकारी धोरण आजच्या काळातही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. शिवरायांनी शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. दुष्काळावर मात करण्यासाठी शाश्वत पाणी व्यवस्थापन, शेतकऱ्यांना हमीभाव आणि आर्थिक स्थैर्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सामाजिक समता, सर्वधर्म समभाव, दजेंदार शिक्षण आणि आरोग्य सुविधा यांवरही त्यांनी भर दिला. संमेलनाध्यक्षा आरती झोटिंग यांनी साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. साहित्यिकांनी समाजाला दिशा देणारे आणि माणुसकीचा धर्म जपणारे साहित्य निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांना छत्रपती शिवाजी महाराज शिक्षणरत्न जीवनगौरव पुरस्कार, ज्येष्ठ साहित्यिक शिवा प्रधान यांना साहित्यरत्न जीवनगौरव पुरस्कार, तर विक्रम मालन आप्पासो शिंदे यांना युवा साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

उद्घाटन सत्रात भास्कर गिते लिखित अवकाळी पाऊस आणि शाहूबाई गिते लिखित सुकलेला मळा व ओल्या गाऊ आनंदाने या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. सुप्रसिद्ध कवयित्री प्रमोदिनी किन्नाके यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन पार पडले. कवींनी सादर केलेल्या बहारदार रचनांना रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी आमदार रोहिदास चव्हाण, नगराध्यक्ष शहाजीराजे नळगे, बाबुराव केंद्रे, स्वागताध्यक्ष भास्कर गिते, परमेश्वर पालकर, मारोती कदम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वर्षा मुस्केवाड यांनी तर परमेश्वर पालकर यांनी आभार मानले.

कार्तिक मासाच्या पावन पर्वावर देरडा येथे श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन

१५ ते २२ नोव्हेंबरदरम्यान धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी; २२ नोव्हेंबर रोजी भव्य महाप्रसाद

दै. सिंहवाणी वृत्त, देरडा (ता.समुद्रपूर, जि.वर्धा)

कार्तिक मासाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून समस्त देरडा ग्रामवासी मंडळी, देरडा (सावंगी) यांच्या सौजन्याने संगीतमय, हृदयस्पर्शी श्रीमद् भागवत कथा व नामसंकीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १५ नोव्हेंबरपासून या धार्मिक सप्ताहाला प्रारंभ होणार असून रविवार, २२ नोव्हेंबर रोजी महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे. या सप्ताहात भागवताचार्य वाणीभूषण ह.भ.प. श्री भूषण महाराज सिंगरवाडे (शेंदुर्जना घाट, जि.अमरावती) यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे निरूपण होणार आहे. तसेच देरडा येथील ह.भ.प. सचिन महाराज कोंबे यांच्या सानिध्यात हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. भागवत सप्ताहाच्या माध्यमातून भगवान श्रीकृष्णांच्या भक्तीमय लीलांचे वर्णन, संतविचार, आध्यात्मिक चिंतन आणि नामस्मरणाचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. संगीताच्या सुरावटी, भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

या सप्ताहासाठी वारकरी मंडळी तसेच भजन- कीर्तन क्षेत्रातील मान्यवरांचे सहकार्य लाभणार आहे. सप्ताहाच्या कालावधीत विविध महाराजांच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने दरशेजच्या पंगतीचे नियोजनही करण्यात आले आहे. रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सप्ताहाचा समारोप होणार असून यानिमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यात परिसरातील भाविक, वारकरी, महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रीमद् भागवत कथेचा व नामसंकीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त देरडा ग्रामवासी मंडळीच्या वतीने करण्यात आले आहे. गावातील धार्मिक परंपरा जोपासण्या बरोबरच भक्ती, अध्यात्म, सामाजिक एकोपा आणि वारकरी संप्रदायाचे विचार रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित हा भागवत सप्ताह देरडा परिसरासाठी श्रद्धा आणि भक्तीचा विशेष सोहळा ठरणार आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त पुराडा येथे जनजातीय गौरव दिन उत्साहात साजरा

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या बिरसा मुंडा मूर्तीस्थळी आदिवासी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

आदिवासी समाजाचे महानायक, क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त देवरी तालुक्यातील पुराडा येथे जनजातीय गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पुराडा येथील आश्रमशाळेच्या परिसरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला आदिवासी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



महाराष्ट्रातील भगवान बिरसा मुंडा यांची सर्वात मोठी मूर्ती पुराडा येथे उभारण्यात आली असून, या मूर्तीस्थळाला जयंतीनिमित्त विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला व भव्य मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या महान कार्याचे स्मरण करून आदिवासी समाजाच्या शौर्य, संघर्ष, स्वाभिमान आणि अस्मितेला उजाळा देण्यात आला.

भगवान बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात संघर्ष करून आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वातंत्र्यासाठी आणि सामाजिक न्यायासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या ऐतिहासिक लढ्यामुळे आदिवासी समाजात स्वाभिमान आणि हक्कांच्या जाणीवेची प्रेरणा निर्माण झाली. त्यांच्या त्याग, संघर्ष आणि क्रांतिकारी विचारांचा वारसा आजही समाजाला दिशा देत आहे.

या कार्यक्रमाला आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम तसेच देवरीचे प्रकल्प अधिकारी नितीन इशुसरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमादरम्यान आदिवासी समाजाच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडले. पारंपरिक वेशभूषा, सांस्कृतिक सादरीकरणे आणि समाजाच्या रूढी-परंपरांमधून आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा अनुभवायला मिळाला.

जनजातीय गौरव दिनाच्या माध्यमातून आदिवासी समाजाची परंपरा, संस्कृती, अस्मिता आणि भगवान बिरसा मुंडा यांचे क्रांतिकारी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला. बिरसा मुंडा यांच्या विचारांचा जागर, आदिवासी अस्मितेचा गौरव आणि सांस्कृतिक एकतेचा संदेश देणारा हा सोहळा पुराडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.